

वर्ष: 6 अंक: 24

16-30 जून, 2026 (नि:शुल्क)

# न्यू इंडिया समाचार




ई-कॉपीसाठी क्यूआर स्कॅन करा.



12वा आंतरराष्ट्रीय योग दिन

## भारताने दिले सूत्र जगाने मिळवली शक्ती

शारीरिक, मानसिक आणि आध्यात्मिक चेतनेचे प्रतीक असलेला 'आंतरराष्ट्रीय योग दिन' संपूर्ण जगाला एकत्र आणणारे एक पवित्र माध्यम बनले आहे. भारताच्या या प्राचीन वारशाने आज जागतिक स्तरावर लोकांचे आरोग्य आणि आंतरिक शांतीचा एक नवीन मार्ग दाखवला आहे...

आम्हाला फॉलो करा @NISPIBIndia



# समृद्ध चोल साम्राज्याचा इतिहास आणि संस्कृतीचा अभिमान

*रेडिओवर प्रसारित होणाऱ्या लोकप्रिय 'मन की बात' कार्यक्रमासाठी दर महिन्याला, देशाच्या विविध भागांतून अनेक संदेश प्राप्त होतात. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पंतप्रधान नरेंद्र मोदी जनतेशी जनहिताचा संवाद साधतात. 31 मे 2026 रोजी प्रसारित मन की बात कार्यक्रमाच्या 134 व्या भागात पंतप्रधान मोदी यांनी उष्णतेपासून संरक्षण करण्याचे उपाय सांगितले तसेच भरपूर पाणी पिण्याचा सल्ला दिला. त्याचबरोबर त्यांनी चोल साम्राज्याचा समृद्ध इतिहास आणि संस्कृतीसह अनेक महत्वपूर्ण विषयांवर संवाद साधला. सादर आहे मन की बातचा संपादित प्रमुख अंश ...*

- **राष्ट्रीय विक्रम :** झारखंडमधील रांची येथे राष्ट्रीय वरिष्ठ ॲथलेटिक्स फेडरेशन स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेत देशभरातील सुमारे ८00 खेळाडूंनी भाग घेतला होता. या स्पर्धेदरम्यान चार वेगवेगळ्या प्रकारांमध्ये चार राष्ट्रीय विक्रम मोडले गेले.
- **उन्हाळ्यापासून बचाव:** सध्या देशातल्या बहुतांश भागात प्रचंड उकाडा वाढला आहे. अशा वातावरणात स्वतःची काळजी घेणे अतिशय महत्त्वाचे आहे. सतत पाणी पीत रहा. उन्हात बाहेर पडणे गरजेचेच असेल, तर थोडी काळजी घेऊन बाहेर पडा. या संदर्भात सरकारच्या विविध विभागांनी जारी केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करायला विसरू नका.
- **सत्तूचे सरबत :** बिहार, झारखंड आणि पूर्व उत्तर प्रदेशातील सत्तूचे सरबत हे अतिशय उत्तम पेय आहे. यामुळे पोटही भरते आणि भरपूर ऊर्जा देखील मिळते.
- **ताम्रपट :** युरोपमधल्या नेदरलँड्समधील भेटीदरम्यान एक असा क्षण आला, ज्याने प्रत्येक भारतीयाला अभिमानाने भारून टाकले. तिथे आयोजित एका विशेष समारंभात, चोला काळातील प्राचीन ताम्रपट भारताकडे पुन्हा सुपूर्द करण्यात आले.
- **खगोलशास्त्र :** आपल्या देशात खगोलशास्त्रीय ज्ञानाने प्रत्येक पिढीमध्ये कुतूहल निर्माण केले आहे. संशोधनाला प्रेरित केले आहे. आजच्या युवकांमध्येही त्याबद्दल प्रचंड उत्साह दिसून येत आहे.
- **डॉल्फिन :** डॉल्फिन बचाव रुग्णवाहिकेची रचना एका चालत्या-फिरत्या रुग्णालयाप्रमाणे करण्यात आली आहे . त्यात डॉल्फिनना सुरक्षित ठेवण्याची व्यवस्था आहे. यामध्ये ऑक्सिजनची सुविधा, विशेष स्ट्रेचर्स आणि बचाव साहित्य आहे. म्हणजेच, जर एखादा डॉल्फिन जखमी झाला,कालव्यात अडकला किंवा नदीपासून दूर गेला , तर त्याला तात्काळ मदत केली जाऊ शकते.
- **जैवविविधता :** जेव्हा आपण गंगा डॉल्फिनला वाचवतो, तेव्हा आपण केवळ एक प्रजातीच वाचवत नाही, तर आपण गंगेच्या जैवविविधतेचेही रक्षण करतो. आपण नदीची संपूर्ण जीवनप्रणाली वाचवतो आणि त्याचबरोबर आपल्या भावी पिढ्यांसाठी निसर्गाचा एक अमूल्य वारसाही वाचवतो.
- **खूप मोठ्या साधनांची गरज नाही:** केरळमधील अलुवा येथे साजी वलाशेरिल यांनी आतापर्यंत 15 हजारांहून अधिक लोकांना पोहायला शिकवले आहे. एका नौका दुर्घटनेत अनेक विद्यार्थ्यांचा मृत्यू झाल्यानंतर ही मोहीम सुरु करण्यात आली होती. साजी वलाशेरिल यांचे जीवन आपल्याला हीच शिकवण देते की सेवा करण्यासाठी खूप मोठ्या साधनांची गरज नसते . गरज असते एका उदात्त हेतूची आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांची.
- **देशभक्तीची भावना :** गिरीजा अम्मा जी सुमारे 15 शाळा चालवतात. यामध्ये चेन्नईमधले जयगोपाल गरोडिया हिंदू विद्यालय विशेष उल्लेखनीय आहे. त्यांची देशभक्तीची भावना प्रत्येक भारतीयाला प्रेरित करणारी आहे.
- **लोकांची शक्ती :** भारतातील प्रत्येक गावात आणि शहरात काही ना काही असे घडत असते जे आपल्याला प्रेरणा देते. अनेकदा या प्रयत्नांची फारशी चर्चा होत नाही, पण जेव्हा आपल्याला त्यांची जाणीव होते, तेव्हा हा विश्वास अधिक मजबूत होतो की देश आपल्या लोकांच्या सामर्थ्याने पुढे जात आहे.
- **चांगले काम :** मी तुम्हाला आवाहन करतो की, तुम्ही तुमच्या आजूबाजूला असे प्रयत्न नक्की शोधा. जे लोक समाजासाठी चांगलं काम करत आहेत, त्यांच्यापर्यंत पोहोचा , त्यांचे कौतुक करा, त्यांच्याकडून शिका आणि शक्य असल्यास, स्वतः देखील एखाद्या चांगल्या कामात सहभागी व्हा.

'मन की बात' पूर्ण ऐकण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

न्यू इंडिया
समाचार
वर्ष: 6, अंक: 24 I 16-30 जून, 2026

प्रधान संपादक
**धीरेंद्र ओझा**
प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय , नवी दिल्ली

मुख्य सल्लागार संपादक
**संतोष कुमार**

वरिष्ठ सहाय्यक सल्लागार संपादक
**पवन कुमार**

सहाय्यक सल्लागार संपादक
**अखिलेश कुमार**
**चंदन कुमार चौधरी**

भाषा संपादक
**सुमित कुमार (इंग्रजी)**
**रजनीश मिश्रा (इंग्रजी)**
**नदीम अहमद (उर्दू )**

वरिष्ठ डिझायनर
**फूलचंद तिवारी**

डिझायनर
**अभय गुप्ता**
**सत्यम सिंह**




**13 भाषांमध्ये उपलब्ध न्यू इंडिया समाचार वाचण्यासाठी येथे क्लिक करा.**
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

**न्यू इंडिया समाचारचे जुने अंक वाचण्यासाठी क्लिक करा.**
https://newindiasamachar.pib.gov.in/archive.aspx

न्यू इंडिया समाचार बद्दल नियमित अपडेटसाठी फॉलो करा:-@NISPIBIndia

# आतील पानांवर..



**मुखपृष्ठ कथा**

21 जून रोजी 12 वा आंतरराष्ट्रीय योग दिन आहे. हा एक विशेष प्रसंग घेऊन आला आहे. यावर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने 12 वर्षे पूर्ण केली आहेत, त्यामुळे जून महिना हा उत्सवाचा महिना बनला आहे. | 8-17

**पद्म पुरस्कार 2026**



**राष्ट्रनायकांचे अभिनंदन...**



नागरी सन्मान सोहळा -1 मध्ये वर्ष 2026 च्या पद्म पुरस्कारांनी सन्मानित झाल्या देशातील ६६ मान्यवर व्यक्ती | 22-27

**वृत्त सार** | 4-5

**व्यक्तिमत्व : विनिता सोरेन**
माऊंट एव्हरेस्ट सर करणारी पहिली भारतीय आदिवासी तरुणी | 6

**नियमित देखरेख आणि लोकसहभागावर भर**
पंतप्रधान मोदी यांनी 51 व्या प्रगती बैठकीचे भूषवले अध्यक्षपद | 7

**युवकांची सातत्यपूर्ण प्रगती, विकसित भारताची शक्ती**
19 व्या रोजगार मेळाव्यात 51 हजारांहून अधिक नियुक्तीपत्रे वितरित | 18-19

**खाद्य सुरक्षा आणि स्वच्छ वाहतुकीला नवी गती**
केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले अनेक महत्वपूर्ण निर्णय | 20-21

**युरोप पासून ते आखाती देशांपर्यंत**
**भारताच्या वाढत्या जागतिक सामर्थ्याचे प्रदर्शन**
पंतप्रधान मोदी यांचा संयुक्त अरब अमिरात, नेदरलँड्स , स्वीडन, नॉर्वे आणि इटली देशांचा दौरा, भारताच्या नव्या जागतिक रणनीतीचे सशक्त प्रदर्शन | 28-32



**प्रकाशक : कंचन प्रसाद,** महासंचालक, सीबीसी ( केंद्रीय संचार ब्युरो ) **पत्र व्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता :** खोली क्रमांक -1077, सूचना भवन, सीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003. **ईमेल - response-nis@pib.gov.in, आर. एन. आय . क्रमांक DELHIN/2020/78812**

# संपादकांच्या लेखणीतून...

## योग: भारताचा प्राचीन वारसा

# जगाची ओळख

*सप्रेम नमस्कार !*

प्रिय वाचकांनो, जूनचा महिना यावेळी एक विशेष प्रसंग आणि उत्सवाचा संदेश घेऊन आला आहे. एकीकडे, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली केंद्र सरकारची 12 वर्षे पूर्ण झाल्याचा प्रसंग आहे, तर दुसरीकडे, जग 12 वा आंतरराष्ट्रीय योग दिन देखील साजरा करत आहे. 12 या अंकाचा हा योगायोग संधी आणि उत्सवाचा एक अनोखा संगम सादर करत आहे .

आजच्या वेगवान जीवनात योग मन, शरीर, बुद्धी आणि आत्मा यात समतोल साधत व्यक्तीच्या जीवनात शांतीची अनुभूती निर्माण करतो. योग व्यक्तीला कुटुंबाशी जोडून आनंदी राहण्याचा मार्ग प्रशस्त करतो. कुटुंबांना समाजाप्रति संवेदनशील बनवून सामाजिक सद्भावना दृढ करतो. हाच समाज राष्ट्राच्या एकतेचा बनतो आणि जगात शांतता व सौहार्दाचा संदेश प्रसारित करतो. अशा प्रकारे योग व्यक्ती, कुटुंब, समाज, राष्ट्र, जग आणि संपूर्ण मानवतेला जोडण्याचे कार्य करतो.

वर्ष 2014 मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांना जागतिक समुदायाकडून अभूतपूर्व समर्थन प्राप्त झाले होते , ज्यामुळे वर्ष 2015 पासून दरवर्षी 21 जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जाऊ लागला. भारतात योग परंपरा सुमारे 5,000 वर्षे जुनी आहे मात्र संयुक्त राष्ट्र महासभेच्या मान्यतेने तिला जागतिक ओळख प्रदान केली. त्याचबरोबर योगसाधनेशी संबंधित आर्थिक घडामोडींचा विस्तार झाला आणि आरोग्यासह आर्थिक सशक्तीकरणालाही नवीन गती मिळाली. आज योग भारताची जागतिक ओळख बनला आहे. दरवर्षी 21 जून हा दिवस आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून साजरा केला जातो. हीच यावेळच्या आपल्या अंकाची मुखपृष्ठ कथा बनली आहे.

याशिवाय व्यक्तिमत्व या मालिकेत माऊंट एव्हरेस्ट सर करणारी पहिली भारतीय आदिवासी तरुणी विनीता सोरेन , केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय, परदेश दौरे, रोजगार मेळावा, 51 व्या प्रगती बैठकीच्या अध्यक्षपदासह पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे पंधरवड्यातील कार्यक्रम यात समाविष्ट करण्यात आले आहेत.

तसेच, पाक्षिकाच्या आतील पानावर मन की बात आणि मलपृष्ठावर दरवर्षी 27 जून रोजी साजऱ्या केल्या जाणाऱ्या आंतरराष्ट्रीय एमएसएमई दिनानिमित्त विशेष सामग्री अंतर्भूत आहे.

तुम्ही तुमच्या सूचना आम्हाला पाठवत रहा.

(धीरेंद्र ओझा)

हिंदी, इंग्रजी आणि इतर 11 भाषांमध्ये उपलब्ध असलेले हे पाक्षिक वाचा/डाउनलोड करा.
https://newindiasamachar.pib.gov.in/news.aspx

# वाचकांच्या प्रतिक्रिया...






## वाचकांच्या मनाला खोलवर स्पर्श करते हे पाक्षिक

'न्यू इंडिया समाचार ' प्रमुख योजना आणि 'नव भारता'ची भावना अधोरेखित करते. माझा विश्वास आहे की, हे रचनात्मक योगदान एका जागरूक नागरिकाच्या दृष्टिकोनातून लिहिले जाते. जे वाचकांच्या मनाला खोलवर स्पर्श करते. प्रभावित क्षेत्रांमध्ये आम्हाला अपेक्षित असलेले भावनिक आणि मनोवैज्ञानिक बदल यातून दिसून येतात. तुमचा मौल्यवान वेळ आणि भारताच्या प्रगतीचे दस्तऐवजीकरण करण्याच्या तुमच्या उल्लेखनीय कार्याबद्दल तुम्हाला मनापासून धन्यवाद.

**राजा मुथ्याला**

**rajaa.muthyala@gmail.com**

## देश विकासाच्या मार्गावर अग्रेसर

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मी देशाचे ऐतिहासिक महत्व आणि प्रथमच काशी विश्वनाथ मंदिराच्या वैदिक घड्याळाबद्दल ऐकले आणि वाचले. देशाचे हे भाग्य आहे की पंतप्रधान मोदी यांचे व्यवस्थापन आणि दूरदर्शी विचारांसह भारत विकासाच्या मार्गावर आगेकूच करत आहे. त्याचबरोबर भावी पिढयांना प्रेरणा मिळत आहे. भावी पिढी जागरूक बनत आहे.

**नीरज कुमार अग्रवाल**

**neerajagarwal951@gmail.com**

## जलद गतीने प्रगती करत आहे भारत

मला न्यू इंडिया समाचार मधील लेख डिजिटल मीडियाच्या माध्यमातून वाचायला मिळाला. आपला भारत सर्वात जलद गतीने प्रगती करत आहे. देशाच्या प्रगतीसाठी काम करणाऱ्या प्रत्येक महिलेचा मला अभिमान वाटतो. ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून जगाने भारताचे अद्भुत सामर्थ्य पाहिले.

**jamesdevassy603@gmail.com**

## प्रेरणादायी आणि उपयुक्त लेख छापल्याबद्दल अभिनंदन

मी न्यू इंडिया समाचारच्या 1-15 मे , 2026 च्या अंकात छापलेली उत्तम मुखपृष्ठ कथा “नवीन भारत आणि महिला-प्रणित नेतृत्व” ची मनापासून प्रशंसा करतो. नवीन भारतात महिला कशा प्रकारे परिवर्तन आणि राष्ट्र -निर्माणाच्या खऱ्या चालक म्हणून उदयाला येत आहेत हे या लेखात अतिशय सुंदररित्या दाखवले आहे. “ती पूर्वनिर्धारित सीमांच्या बंधनात अडकून राहण्यासाठी बनलेली नव्हती, तर नवीन मार्ग बनवण्यासाठी बनली होती ' या ओळी विशेष प्रेरणादायी होत्या. या लेखात पंतप्रधान मोदी यांचा महिला शक्ती मजबूत करण्याची आणि महिलांच्या नेतृत्वाखाली विकासाला बळकटी देण्याची दूरदृष्टी आणि वचनबद्धता प्रभावीपणे दाखवली आहे. इतका प्रेरणादायी लेख छापल्याबद्दल संपादकीय चमूचे अभिनंदन .

**michaelbks@gmail.com**

## विकासाशी संबंधित सर्व ताज्या बातम्या आणि प्रयत्न जाणून आनंद झाला

देशात सुरु असलेल्या विकास प्रवासावरील एका सर्वसमावेशक पाक्षिकासाठी माझ्याकडून हार्दिक अभिनंदनाचा स्वीकार करा. मी हे पाक्षिक नियमितपणे वाचतो. विकासाशी संबंधित सर्व ताज्या बातम्या आणि प्रयत्न वाचून खरेच खूप आनंद झाला.

**मनमोहन बहेड**

**man.bahed82@gmail.com**

पत्रव्यवहार आणि ईमेलसाठी पत्ता: खोली क्रमांक 1077,सूचना भवन, सीजीजीओ कॉम्प्लेक्स, नवी दिल्ली- 110003

**ईमेल- response-nis@pib.gov.in**

वृत्त सारांश



## 'विकसित भारत-जी राम जी' 1 जुलै पासून होणार लागू

ग्रामीण भारतातील विकास आणि रोजगाराला नवी दिशा देण्याच्या उद्देशाने असलेला 'विकासित भारत-रोजगार आणि उपजीविका हमी अभियान' (ग्रामीण), म्हणजेच 'विकसित भारत जी राम जी कायदा', 1 जुलै 2026 पासून देशभरात लागू केला जात आहे. या नवीन प्रणालीअंतर्गत, ज्या ग्रामीण कुटुंबातील प्रौढ सदस्य अकुशल शारीरिक श्रमाच्या कामाची मागणी करतील, त्या प्रत्येक कुटुंबाला प्रति आर्थिक वर्षामध्ये 125 दिवसांच्या वेतन-आधारित रोजगाराची वैधानिक हमी दिली जाईल. ही हमी पूर्वीच्या मनरेगा अंतर्गत प्रदान केलेल्या 100 दिवसांच्या रोजगार हमीपेक्षा 25 दिवसांनी जास्त आहे.

नवीन कायदा कामगारांना त्यांच्या रोजगाराच्या मागणीनुसार एका विहित कालावधीत काम उपलब्ध करून देतो. अन्यथा, कामगार बेरोजगारी भत्त्यासाठी पात्र असतील. वेतन साप्ताहिक किंवा हजेरीपत्रक बंद झाल्यापासून श्रमिकांना त्यांच्या कामाचे पैसे 15 दिवसांच्या आत त्यांच्या बँक खात्यामध्ये थेट जमा केले जातील.

श्रमिकांना ऑनलाइन पोर्टलद्वारे डीबीटी म्हणजेच कामगारांच्या खात्यात थेट रक्कम हस्तांतरित केली जाईल. असे न झाल्यास, कायद्यातील तरतुदींनुसार कामगार विलंब भरपाईसाठी पात्र असतील. जोपर्यंत ग्रामीण रोजगार हमी कार्ड जारी होत नाही, तोपर्यंत सध्याची ई-केवायसी सत्यापित मनरेगा जॉब कार्डे 'विकासित भारत-जी राम जी' अंतर्गत वैध राहतील. केवळ ई-केवायसी प्रलंबित असल्यामुळे कोणत्याही कामगाराला रोजगार नाकारला जाणार नाही.

## भोपाळमध्ये नौदल नौकानयन केंद्राचे उद्घाटन

भारतीय नौदलाने 17 मे 2016 रोजी भोपाळचा प्रसिद्ध 'बडी झील', म्हणजेच 'भोजताल' या नावाने ओळखल्या जाणा-या तलावामध्ये प्रमुख नौदल नौकानयन केंद्राचे उद्घाटन केले. अत्याधुनिक सुविधांनी सुसज्ज असलेल्या या नौकानयन केंद्राचा उपयोग भारतीय नौदल नौकानयन संघ, नौदलाचे रोइंग, कॅनोइंग आणि कयाकिंग संघ, तसेच राष्ट्रीय छात्र सेनेच्या (एनसीसी) प्रशिक्षणासाठी मोठ्या प्रमाणावर केला जाईल. सध्या, नौदल नौकानयन संघाच्या 34 सदस्यांपैकी 17 सदस्य मध्य प्रदेशातील आहेत. राज्यातील अधिक तरुणांना स्पर्धात्मक जलक्रीडा प्रकारांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रेरित करणे आणि त्यांना संरक्षण दलात सामील होण्यासाठी प्रोत्साहित करणे, हा या सुविधेचा उद्देश आहे. ऑलिम्पिक आणि आशियाई खेळांसाठी जागतिक दर्जाची क्रीडा प्रतिभा घडवण्याच्या पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या दूरदृष्टीला साकार करण्याच्या दिशेने हे एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.




## 'कॉफीज ऑफ नागालँड' मोहिमेचा शुभारंभ

नागालँडसाठी एक क्लस्टर-आधारित 'कॉफी मूल्य साखळी विकास अभियान' सुरू करण्यात आले आहे. 'कॉफीज ऑफ नागालँड' हे अभियान 175 कोटी रुपयांच्या तरतुदीसह तयार करण्यात आले आहे. या अभियानात समाविष्ट असलेले उपाय कॉफी उत्पादक समुदायांच्या जमिनीवरील वास्तव आणि आकांक्षांशी सुसंगत असतील, हे सुनिश्चित करण्यात आले आहे. हे अभियान क्लस्टर-आधारित दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. इतकेच नाही, तर ईशान्य प्रदेश विकास आणि दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य एम. सिंदिया यांनी 'अरुणाचल किवीः अरुणाचल प्रदेशचे वैशिष्ट्य - अरुणाचल प्रदेश राज्यासाठी क्लस्टर-आधारित किवी शेती आणि मूल्य साखळी विकास अभियान'ही सुरू केले आहे.



# भारताची पहिली स्वदेशी हायड्रोजन रेलगाडी ... फक्त पाणी आणि वाफ

भारताची पहिली स्वदेशी हायड्रोजन रेल गाडी रुळांवर धावण्यासाठी सज्ज झाली आहे. ही भविष्यवेधी, धूर आणि प्रदूषणमुक्त ट्रेन 1,200 किलोवॅट क्षमतेच्या इंजिनसह ताशी 75 किलोमीटरच्या कमाल वेगाने धावेल. भारतीय रेल्वेने उत्तर रेल्वेच्या जिंद-सोनीपत मार्गावर या 10 डब्यांच्या हायड्रोजन फ्युएल सेल-आधारित ट्रेनच्या संचालनास मंजुरी दिली आहे. रेल्वेमधील पुढच्या पिढीच्या इंधन तंत्रज्ञानाच्या विकासात हे एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरेल.

हायड्रोजन ट्रेनच्या उपक्रमामुळे, भारत आता जर्मनी, जपान, चीन आणि अमेरिका यांसारख्या निवडक देशांच्या प्रतिष्ठित गटात सामील झाला आहे. यामुळे स्वच्छ रेल मार्ग वाहतुकीसाठी हायड्रोजनच्या वापराचा शोध घेतला जात आहेत. नवीन विचार आणि नवीन ऊर्जेसह, नव्या भारताच्या या हायड्रोजन रेल गाडीमुळे कोणतेही प्रदूषण होत नाही, केवळ पाण्याच्या उत्सर्जित वाफेवर ही गाडी चालते. स्वदेशी तंत्रज्ञान, सुरक्षित संचालन आणि स्वच्छ ऊर्जेसह, ही ट्रेन भारताच्या शून्य कार्बन उत्सर्जनाच्या दिशेने एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे.




## 30 जूनपर्यंत देशभरात 'शेती वाचवा मोहीम'

'शेती वाचवा मोहीम' हा केवळ एक जनजागृती कार्यक्रम नसून, शेती, शेतकरी आणि गावे यांना जोडणारी एक व्यापक राष्ट्रीय मोहीम आहे. ही मोहीम प्रत्येक गावात पोहोचवली जात आहे. रासायनिक खतांचा असंतुलित वापर कमी करणे, हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. या मोहिमेअंतर्गत शेतकऱ्यांना माती परीक्षण-आधारित, संतुलित आणि योग्य खत वापराबरोबरच इतरही अनेक गोष्टींची माहिती दिली जाईल.



## 'लोकसंख्याशास्त्रीय बदलावरील उच्चस्तरीय समिती'ची स्थापना

घुसखोरी आणि इतर घटकांमुळे होणारा अनैसर्गिक लोकसंख्याशास्त्रीय बदल हा कोणत्याही राष्ट्राच्या वर्तमान आणि भविष्यासमोर एक मोठे आव्हान उभे करतो. या आव्हानाला सामोरे जाण्यासाठी, 15 ऑगस्ट 2025 रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी “लोकसंख्याशास्त्रीय बदलावरील उच्चस्तरीय समिती” स्थापन करण्याची घोषणा केली. या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. आता सरकारने ही समिती स्थापन केली आहे. ही समिती अवैध स्थलांतर आणि इतर असामान्य घटकांमुळे संपूर्ण भारतात होणाऱ्या लोकसंख्याशास्त्रीय बदलांचे सर्वसमावेशक मूल्यांकन करेल, धार्मिक आणि सामाजिक समुदायांच्या स्तरावरील असामान्य लोकसंख्या बदलांच्या पद्धतींचे विश्लेषण करेल आणि नियोजित वेळेवर उपाययोजना सुचवेल. ▪



जन्मः 21 जून 1987

# माउंट एव्हरेस्ट शिखर सर करणारी पहिली भारतीय आदिवासी तरुणी

*झारखंडच्या विनिता सोरेनने माउंट एव्हरेस्ट शिखर सर करणारी पहिली आदिवासी तरुणी बनून इतिहास रचला आहे. वयाच्या 25 व्या वर्षी विनिताने गाठलेली उंची ही तिच्या कठोर परिश्रमाची आणि अदम्य धैर्याची कहाणी आहे. हे जगातील सर्वोच्च शिखर सर करून तिने हे सिद्ध केले आहे की, कोणतीही सामाजिक बंधने स्वप्नांच्या उंचीला मर्यादा घालू शकत नाहीत. झारखंडमधील एका छोट्या गावातून जगातील सर्वोच्च शिखरापर्यंतचा प्रवास करणारी विनिता सोरेन बनली आहे देशभरातील मुलींसाठी एक प्रेरणास्थान...*

माउंट एव्हरेस्ट शिखर सर करणाऱ्या विनिताच्या आयुष्याची सुरुवात, इतर कोणत्याही आदिवासी मुलीसारखीच झाली. झारखंडमधील सामान्य मुलींचे जीवन हे शेतात काम करणे, मर्यादित शिक्षण आणि थोडीफार स्वप्ने एवढेच मर्यादित होते, पण विनिताची स्वप्ने एव्हरेस्टपेक्षाही उंच होती. 21 जून 1987 रोजी जन्मलेल्या विनिताने केवळ माउंट एव्हरेस्ट शिखर सर केले नाही, तर आपला ध्यास, उत्साह आणि दृढनिश्चयाच्या जोरावर भारतीय आदिवासी समाजाला एक नवी ओळखही दिली आहे.

कोल्हान यांच्या या कन्येचे विनिता सोरेनचे बालपण शेतात आणि लहानमोठी स्वप्ने बघण्यात सरले. तिच्या गावात आणि आसपासच्या परिसरात, मुलींसाठी शिक्षिका किंवा परिचारिका बनणे एवढेच करिअरचे पर्याय मानले जात होते, पण विनिताचे स्वप्न पूर्णपणे वेगळे होते. एव्हरेस्ट सर करण्यासाठी तिला सात वर्षे कठोर परिश्रम करावे लागले. या काळात तिला समजले की, गिर्यारोहण ही केवळ शारीरिक शक्तीची परीक्षा नाही, तर मानसिक सामर्थ्य, धैर्य आणि दृढनिश्चयाचीही परीक्षा आहे. विनिताला आत्यंतिक कडाक्याच्या थंडीमध्ये आणि हिमवृष्टीमध्ये अनेक कठीण गोष्टींचा सामना करावा लागला. तिला अनेकदा असेही वाटले की, आपल्या या प्रवासाला कोणतेही अंतिम ध्येय नाही, पण धैर्य, समर्पण आणि जग जिंकण्याच्या तीव्र इच्छेने तिला त्या बर्फाच्छादित पर्वताच्या सर्वोच्च शिखरावर पोहोचवले.

वर्ष 2004 मध्ये विनिता पहिल्यांदा बचेंद्री पाल यांना भेटली आणि त्यांच्या प्रेरणेने तिने गिर्यारोहक बनण्याचे ध्येय निश्चित केले. एव्हरेस्ट सर करणाऱ्या पहिल्या भारतीय महिला बचेंद्री पाल यांनी झारखंडच्या विनिता सोरेनला प्रशिक्षण दिले होते. आदिवासी आणि शेतकरी कुटुंबातून आल्यामुळे तिच्यात गिर्यारोहक बनण्याचे धाडस नव्हते. घरातून बाहेर पडणे हेच तिच्यासाठी एव्हरेस्ट सर करण्यासारखेच होते, पण तिच्या कुटुंबाने तिच्यावर विश्वास ठेवला आणि तिला पुढे जाण्यासाठी प्रोत्साहन दिले. कठोर प्रशिक्षणानंतर, जेव्हा बचेंद्री पाल यांनी विनिताला सांगितले की ती आता एव्हरेस्टसाठी तू तयार आहे, तेव्हा ती स्वतःला रोखू शकली नाही. अखेरीस, तिने एव्हरेस्ट सर केले. त्यानंतर तिने इतर अनेक शिखरे सर केली. आज तिचे कुटुंब तिच्या नावाने ओळखले जाते.

झारखंडच्या सेराईकेला-खरसावन जिल्ह्यातील केसोरसोरा गावची रहिवासी असलेल्या विनिताच्या एव्हरेस्ट मोहिमेला टाटा स्टीलने त्यांच्या कॉर्पोरेट सामाजिक जबाबदारीचा भाग म्हणून पाठिंबा दिला. एका ग्रामीण आदिवासी मुलीने जगातील सर्वोच्च शिखर असलेल्या 8,848 मीटर उंचीच्या शिखरावर केलेली चढाई हाच एक विक्रम होता. तिच्या या कामगिरीबद्दल तिला देशभरातून अनेक सन्मान आणि पुरस्कार मिळाले आहेत. ■



पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली 'प्रगती'ची 51 वी बैठक

# नियमित देखरेख आणि लोकांच्या सहभागावर भर

*प्रगती (सक्रिय प्रशासन आणि वेळेवर अंमलबजावणी) हे भारतातील डिजिटल प्रशासनासाठी एक महत्त्वपूर्ण आणि प्रभावी व्यासपीठ ठरले आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली, 'प्रगती'च्या नियमित बैठका होतात. या व्यासपीठाने मार्च 2015 पासून 85 लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त किमतीच्या सुमारे 390 मोठ्या प्रकल्पांच्या प्रगतीला गती देण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. या संदर्भात, 27 मे रोजी पंतप्रधान मोदी यांनी प्रगतीच्या 51 व्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. बैठकीचा उद्देश प्रकल्प कार्यक्षमतेने आणि वेळेवर पूर्ण व्हावेत यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांच्या प्रयत्नांमध्ये समन्वय साधणे हा होता...*

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रेल्वे, ऊर्जा आणि रस्ते क्षेत्रातील सुमारे 30, 000 कोटी रुपयांच्या सात पायाभूत प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी आयसीटी-सक्षम, बहु-आयामी 'प्रगती' व्यासपीठाच्या 51 व्या बैठकीचे अध्यक्षस्थान भूषवले. या बैठकीत


## पंतप्रधान मोदी यांनी घेतला महत्त्वाच्या प्रकल्पांचा आढावा

- रेल्वे, वीज आणि रस्ता या क्षेत्रांशी संबंधित पायाभूत सुविधा
- स्वच्छ भारत मिशन-शहरी 2.0 आणि केन-बेटवा लिंक योजना
- शहरी भागात मिशन-मोडमध्ये छतावर सौर प्रकल्पांची व्याप्ती वाढवण्याचे आवाहन

आढाव्यात समाविष्ट **30,000** कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे हे प्रकल्प 9 राज्यांमध्ये विस्तारलेले आहेत.

पंतप्रधान मोदींनी सार्वजनिक प्रकल्पांच्या अंमलबजावणीतील विलंबामुळे केवळ खर्चच वाढत नाही, तर सामान्य नागरिकांना मिळणाऱ्या सेवांनाही विलंब होतो यावर जोर दिला. ते म्हणाले की, प्रत्येक विलंबाचा लोकांच्या जीवनावर, प्रादेशिक विकासावर आणि सार्वजनिक संसाधनांवर थेट परिणाम होतो. त्यामुळे, मंत्रालये, विभाग आणि राज्यांनी प्रलंबित प्रश्न सोडवण्यासाठी, अडथळे दूर करण्यासाठी आणि कामाची पूर्तता जलद करण्यासाठी सक्रिय भूमिका घेतली पाहिजे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, केन-बेटवा नदीजोड प्रकल्प इतर राज्यांसाठी एक आदर्श प्रारूप ठरू शकतो. जेणेकरून संबंधित राज्यांना त्यांच्यातील पाण्यासंबंधीचे प्रश्न परस्पर सामंजस्याने सोडवता येतील. त्यांनी राज्यांना घनकचरा व्यवस्थापनाशी संबंधित पायाभूत सुविधांचे काम शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यास सांगितले आहे. त्यात प्रक्रिया संयंत्रे आणि शेण संयंत्रांचाही समावेश आहे. दरम्यान, पंतप्रधान मोदींच्या सल्ल्यानुसार राज्यस्तरीय योजनांच्या मासिक आढाव्याची व्यवस्था सुरू करण्यात आली आहे. त्याची सुरुवात स्वच्छ भारत मिशनच्या आढाव्याने झाली. ▪



## आंतरराष्ट्रीय योगदिनाची 12 वर्ष

# योगाभ्यास बनला जगातील सर्वात मोठा सांस्कृतिक महोत्सव

*"योगश्चित्तवृत्तिनिरोधः" योग म्हणजे मनाच्या आवेगांवर नियंत्रण ठेवणे. 2014 मध्ये, आयुर्वेद, योग आणि इतर पारंपरिक वैद्यकीय प्रणालींना आरोग्यसेवेत समाकलित करण्यासाठी आयुष मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. भारताच्या प्रयत्नांमुळे 21 जून 2015 रोजी जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जाऊ लागला. योग हे आपल्या संस्कृतीचे एक वैशिष्ट्य आहे, जे सर्व प्रकारे आपले आरोग्य जपते. आज, योगाच्या माध्यमातून भारत जागतिक स्तरावर आपली 'सॉफ्ट पॉवर' प्रस्थापित करत आहे...*

*यावर्षी, 21 जून रोजी साजऱ्या होणाऱ्या 12 व्या आंतरराष्ट्रीय योग दिनाला एक विशेष महत्त्व आहे. यावर्षी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला 12 वर्षे पूर्ण होत आहेत, त्यामुळे जून महिना हा उत्सवाचा महिना बनला आहे.*

सर्वसामान्य व्यक्ती असो वा विशेष, तरुण असो वा वृद्ध, स्त्री असो वा बालक, आस्तिक असो वा नास्तिक, 'योग' आज सर्व वयोगटातील लोकांच्या शरीर, ऊर्जेची, मनाची आणि आत्म्याची ओळख बनला आहे. धर्म, पंथ, जात, श्रीमंत-गरीब आणि देशांच्या सीमा ओलांडून ती संपूर्ण जगाची भाषा बनली आहे. योगाचे हेच वैशिष्ट्य महान संस्कृत कवी भर्तृहरी यांनी शतकांपूर्वी त्यांच्या 'शतकत्रयम्' मध्ये लिहिले आहेः

**धैर्यं यस्य पिता क्षमा च जननी शान्तिश्चिरं गेहिनी**
**सत्यं सूनुरयं दया च भगिनी भ्राता मनः संयमः।**
**शय्या भूमितलं दिशोऽपि वसनं ज्ञानामृतं भोजनं**
**एते यस्य कुटिम्बिनः वद सखे कस्माद् भयं योगिनः।।**

शतकांपूर्वी केलेल्या या विधानाचा साधा अर्थ असा आहे की, नियमित योगसाधनेमुळे काही चांगले गुण आपल्या नातेवाईक आणि मित्रांसारखे बनतात. योग धैर्य वाढवतो, जे पित्याप्रमाणे आपले नेहमी रक्षण करते. आई जशी आपल्या मुलांसाठी क्षमाशील असते, तशी क्षमाशीलता जोपासली जाते आणि मानसिक शांती आपली कायमची मैत्रीण बनते. भर्तृहरीने म्हटले आहे की, नियमित योगसाधनेमुळे सत्य आपले बालक, दया आपली बहीण, आत्मसंयम आपला भाऊ, पृथ्वी स्वतः आपली शय्या आणि ज्ञान आपली भूक शमवणारे साधन बनते. जेव्हा इतके सारे गुण आपले सोबती बनतात, तेव्हा योगी सर्व प्रकारच्या भयावर विजय मिळवतो.

खरे तर, जगात कुठेही मोफत आरोग्य विमा मिळत नाही, पण योग ही अशी एकमेव गोष्ट आहे जी शून्य खर्चात आरोग्याची हमी देते. म्हणूनच पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात, "या शतकात आपण अनुभवत आहोत की योगाने जगाला एकत्र आणले आहे. ज्याप्रमाणे योग शरीर, मन, बुद्धी आणि आत्मा यांना एकत्र आणतो, त्याचप्रमाणे आज योग जगाला एकत्र आणत आहे. प्रत्येकाला तणावमुक्त जीवन, आजारपणापासून मुक्ती आणि आनंद हवा असतो. हे सर्व एकाच मार्गाने साध्य करता येते, आणि तो मार्ग म्हणजे योग. एक परिपूर्ण जीवन संतुलितपणे कसे जगता येईल? जर तुम्हाला शरीर, मन, विचार आणि आचरण या सर्व बाबतीत निरोगी राहण्याचा आंतरिक प्रवास अनुभवायचा असेल, तर ते योगाच्या माध्यमातून शक्य होईल."

योग म्हणजे केवळ व्यायाम नव्हे, तर स्वतःशी, जगाशी आणि निसर्गाशी एकरूप होण्याची एक भावना आहे. पंतप्रधान पदाचा कार्यभार सांभाळल्यानंतर अवघ्या चार महिन्यांतच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 27 सप्टेंबर 2014 रोजी योगाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवून देण्याचा उपक्रम सुरू केला. डिसेंबर 2014 मध्ये, संयुक्त राष्ट्र महासभेने 21 जून ला 'आंतरराष्ट्रीय योग दिन' म्हणून मान्यता दिली.

## योग झाले एक वैश्विक पर्व

योगः कर्मसु कौशलम ।। अर्थात, कार्यकौशल्य म्हणजेच योग होय. हा मंत्र आपल्याला सातत्याने शिकवण देतो की, योग जीवनात अधिक सक्षम होण्याची आपली क्षमता वाढवतो. जरी आपण आपले काम शिस्तीने केले आणि आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या, तरीही ते योगाचेच एक रूप आहे. या मंत्राला अंगीकारून, भारताने योगाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळवून स्वतःला एक 'सॉफ्ट पॉवर' म्हणून स्थापित केले आहे. योगाला कर्मयोगाशी जोडून, त्याने व्यक्ती, समाज आणि राष्ट्राच्या विकासाची क्षमता अनेक पटींनी वाढवली आहे.

भारताने, जी-20 या सर्वात प्रभावशाली गटाचे अध्यक्षपद भूषवताना, प्रत्येक कार्यक्रमात योगाचा विशेष समावेश करून भारतीय संस्कृतीची ओळख अधिक दृढ केली. 2014 मध्ये, भारताने आरोग्यसेवेत आयुर्वेदासोबत योग आणि इतर पारंपरिक वैद्यकीय प्रणाली एकत्रित करण्यात पुढाकार घेत, आयुष मंत्रालयाची स्थापना केली. भारताच्या या प्रयत्नांमुळेच 21 जून 2015 रोजी जागतिक स्तरावर आंतरराष्ट्रीय योग दिन साजरा केला जाऊ लागला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रयत्नांमुळेच, भारताची सर्वात जुनी आणि समृद्ध परंपरा असलेला योग, रोगांपासून बचावाचे एक साधन बनला आहे आणि जगाला त्याची शक्ती जाणवली आहे. आज, योग जागतिक सहकार्यासाठी एक परस्पर आधार बनत आहे. आज, योग मानवतेला निरोगी जीवनाचा आत्मविश्वास देत आहे. काही वर्षांपूर्वी केवळ घरांमध्ये आणि आध्यात्मिक केंद्रांमध्ये दिसणारी योगाची प्रतिमा आता जगाच्या कानाकोपऱ्यातून समोर येत आहे.

योग आता एक जागतिक उत्सव बनला आहे, कारण तो व्यक्तींसाठी नसून संपूर्ण मानवजातीसाठी आहे.




*जेव्हा आपण कर्मयोगाच्या भावनेने योगानुसार आचरण करतो, तेव्हा एक व्यक्ती म्हणून, एक समाज म्हणून आणि एक राष्ट्र म्हणून आपली शक्ती अनेक पटींनी वाढते. याच भावनेने, आपण आपल्या आरोग्यासाठी आणि आपल्या प्रियजनांच्या आरोग्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचा संकल्प केला पाहिजे. जागरूक नागरिक म्हणून, आपण एकजुटीने पुढे वाटचाल करू.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**




## योगावरील संशोधन

**100** जिल्ह्यांमध्ये केलेल्या एका बहु-केंद्रित, देशव्यापी अभ्यासात असे आढळून आले आहे की मधुमेह नियंत्रणात ठेवण्यासाठी योग प्रभावी आहे.

- संशोधन प्रकाशनांमध्ये जवळपास सहा पटींनी वाढ झाली आहे, आणि क्लिनिकल चाचण्यांमध्ये अंदाजे 11% वाढ झाली आहे. नवी दिल्ली येथील एम्सच्या सेंटर फॉर इंटिग्रेटिव्ह मेडिसिनचे 20 हून अधिक शोधनिबंध आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमध्ये प्रकाशित झाले आहेत.
- योगाभ्यास करणाऱ्या रुग्णांमध्ये कर्करोग पुन्हा उद्भवण्याचा धोका सुमारे 15 टक्क्यांनी कमी झाला.
- 'न्यूरोलॉजी जर्नल इन मायग्रेन'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अभ्यासानुसार, योगाद्वारे प्री-डायबिटीज अर्थात मधुमेहाची पूर्वस्थिती उलटवणे देखील शक्य आहे आणि अमेरिकन डायबेटिक असोसिएशननेही या अभ्यासाची प्रशंसा केली आहे.
- केवळ आयुष संशोधन पोर्टलवरच योग आणि निसर्गोपचाराशी संबंधित सुमारे 1,426 अभ्यासांची नोंद आहे. यापैकी 1,003 वैद्यकीय अभ्यास आहेत.

## योगदिन उपक्रमात वाढते योगदान

- आंतरराष्ट्रीय योग दिन 2016 मध्ये बाल आणि युवकांसाठीच्या साठीच्या मैत्रीपूर्ण योग प्रात्यक्षिकांमधील सहभागींची संख्या अंदाजे 85 लाख होती, ज्यात 2019 मध्ये वाढ होऊन ती सुमारे 9 कोटी झाली.
- आंतरराष्ट्रीय योग दिन 2022 मध्ये, ही संख्या अंदाजे 22.13 कोटी पर्यंत पोहोचली, तर 2023 मध्ये ही संख्या अंदाजे 23.44 कोटी झाली.
- आंतरराष्ट्रीय योग दिन 2024 मध्ये 24.53 कोटी इतका सहभाग नोंदवला गेला आणि आंतरराष्ट्रीय योग दिन 2025 मध्ये त्याने 26 कोटींचा टप्पा ओलांडला.
- आंतरराष्ट्रीय योग दिन 2026 मध्ये, 21 जून रोजी होणाऱ्या कॉमन योगा प्रोटोकॉल -आधारित मैत्रीपूर्ण योग प्रात्यक्षिकांदरम्यान हा आकडा 27 कोटींचा टप्पा ओलांडण्याची अपेक्षा आहे.

या वर्षी, जगभरात योग दिन साजरा होत असतानाच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने 12 वर्षांचा कार्यकाळ पूर्ण केला आहे. भारतीय संस्कृतीतही बारा वर्षांच्या कालखंडाला विशेष महत्त्व असून, हा काळ एखाद्या तपस्व्याकरता एखाद्या युगासमान मानला जातो. यासोबतच , भारत एक विकसित राष्ट्र बनण्याच्या आपल्या महत्त्वाकांक्षी ध्येयाच्या दिशेने वाटचाल करत आहे.

## जागतिक योग बाजारपेठेचा विस्तार होऊ लागला

योग क्षेत्राशी निगडित असलेल्या अफाट शक्यता प्रत्यक्षात आणण्याची संधी सध्याच्या काळात उपलब्ध आहे. तरुण पिढी नाविन्यपूर्ण कल्पनांसह मोठ्या संख्येने योग क्षेत्रात प्रवेश करत आहे. याच दिशेने पाऊल टाकत, आयुष मंत्रालयाने 'स्टार्टअप योग चॅलेंज' देखील सुरू केले आहे. आयुष क्षेत्राची सर्वात मोठी ताकद म्हणजे हे क्षेत्र प्रत्येकासाठी विविध संधी उपलब्ध करून देते. उदाहरणार्थ, भारतातील आयुष क्षेत्रातील सुमारे 40 हजार सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग सध्या उत्पादनांची विस्तृत श्रेणी उपलब्ध करून देत आहेत आणि विविध उपक्रम राबवत आहेत, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला मोठी बळकटी मिळत आहे.

12 वर्षांपूर्वी देशातील आयुष उद्योग सुमारे 20 हजार कोटी रुपयांचा होता, तर आज आयुष उद्योग 1.5 लाख कोटी रुपयांच्या आसपास पोहोचत आहे. आगामी काळात जागतिक बाजारपेठेत त्याचा आणखी विस्तार होईल. आज, औषधी वनस्पती आणि मसाल्यांच्या जागतिक बाजारपेठेचे मूल्य सुमारे 120 अब्ज डॉलर्स — म्हणजेच साधारण 10 लाख कोटी रुपये — इतके आहे. पारंपरिक औषधांचे हे क्षेत्र सातत्याने विस्तारत आहे आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संधींचा पूर्ण लाभ घेण्यासाठी भारत सज्ज आहे. यामुळे तरुणांसाठी लाखो नवीन रोजगार निर्माण होतील. जागतिक आरोग्य संघटनेने भारताच्या सहकार्याने गुजरातच्या जामनगरमध्ये 'पारंपरिक औषधोपचार जागतिक केंद्र स्थापन केले आहे.

जागतिक आरोग्य संघटनेच्या जागतिक पारंपारिक औषध केंद्रासारख्या उपक्रमांच्या माध्यमातून भारत पारंपरिक औषध क्षेत्रात जागतिक स्तरावर आपले नेतृत्व प्रस्थापित करत आहे. हे केंद्र पारंपरिक औषधांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यावर संशोधन करण्यासाठी उचललेले एक महत्त्वाचे पाऊल आहे. हे जागतिक स्तरावर पुरावा-आधारित पारंपारिक, पूरक आणि एकात्मिक औषधोपचारांसाठी एक महत्त्वपूर्ण ज्ञान केंद्र म्हणून काम करते. याव्यतिरिक्त, केंद्र सरकारने एम्सच्या धर्तीवर तीन नवीन आयुर्वेद संस्थांच्या निर्मितीची घोषणा केली आहे.

## जगाला समजले आपल्या योगाचे महत्त्व.

आयुर्वेदाच्या वाढत्या लोकप्रियतेमागे योग पर्यटन हा आणखी एक प्रमुख घटक आहे. योग हा केवळ एक व्यायाम नाही, तर स्वतःशी, जगाशी आणि निसर्गाशी एकरूप होण्याचा एक मार्ग आहे. जेव्हा 21 जून या दिवसाला आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून मान्यता मिळाली, तेव्हा 193 सदस्य असलेल्या संयुक्त राष्ट्र महासभेत 177 सह-प्रायोजक



## योगातील प्रशिक्षण आणि शिक्षण

- योग योगाच्या प्रचार आणि प्रसारासाठी प्रशिक्षण अत्यंत महत्त्वाचे आहे. या पार्श्वभूमीवर, आयुष मंत्रालय मोरारजी देसाई योग संस्था आणि इतर संस्थांमध्ये विविध स्तरांवर प्रशिक्षण देत आहे.
- सध्या, देशातील 183 हून अधिक विद्यापीठांमध्ये योगाचे अभ्यासक्रम उपलब्ध आहेत. ही विद्यापीठे हे अभ्यासक्रम चालवत आहेत.
- योग प्रशिक्षण आणि प्रमाणपत्र देण्यासाठी योग प्रमाणन मंडळाची (**YCB**) स्थापना करण्यात आली.
- योग प्रमाणन मंडळानुसार, आजपर्यंत 9,600 हून अधिक मूल्यांकन, 480 हून अधिक परीक्षा आणि 14 हून अधिक भाषिक चाचण्या घेण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त, 56 हून अधिक देशांतील उमेदवारांचे मूल्यांकन करण्यात आले आहे.
- एका अहवालानुसार, सध्या जगभरात अंदाजे तीन कोटी योग साधक आहेत. या दशकाच्या अखेरीस ही संख्या 35 कोटींपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.
- सध्या, योग प्रमाणन मंडळाच्या कार्यांमध्ये योग व्यावसायिकांचे प्रमाणन, योग संस्थांची पडताळणी, योग व्यावसायिकांसाठीच्या प्रमाणन संस्थांना मान्यता देणे आणि स्थाननिश्चितीच्या मानकांनुसार योग संस्थांचे श्रेणीकरण करणे यांचा समावेश आहे.
- परदेशातील विद्यापीठांमध्येही योग विभाग स्थापन करण्यात आले आहेत. गेल्या पाच वर्षांत जगभरातील योग शाळा आणि स्टुडिओमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे.
- अमेरिकन कॉलेज ऑफ स्पोर्ट्स मेडिसिनच्या टॉप 10 यादीत योगाला 7 वे स्थान मिळाले आहे. भारत सरकारने आता योगाला एक स्पर्धात्मक खेळ म्हणून मान्यता दिली आहे.







देशांचे विक्रमी एकमत झाले."योग आरोग्य आणि कल्याणासाठी एक समग्र दृष्टिकोन प्रदान करतो. तो जीवनाच्या सर्व क्षेत्रांमध्ये सुसंवाद साधतो. त्यामुळे, योग साधनेच्या आरोग्यविषयक फायद्यांविषयीची माहिती जगभरातील लोकसंख्येपर्यंत व्यापकपणे पोहोचवणे फायदेशीर ठरेल." असे त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने आपल्या ठरावात मान्य केले. यामुळे भारतात, उपचाराऐवजी प्रतिबंधाच्या तत्त्वावर आधारित, सर्वांगीण आरोग्य क्रांतीच्या एका नवीन युगाची सुरुवात झाली. जेव्हा भारताने संयुक्त राष्ट्रांमध्ये योगाचा प्रस्ताव मांडला, तेव्हा तो जगातील बहुसंख्य सहभागी देशांनी स्वीकारलेला पहिला ठराव ठरला.

## आंतरराष्ट्रीय योग दिन - 2026

आंतरराष्ट्रीय योग दिन (IDY) 2026 चा मुख्य कार्यक्रम 21 जून रोजी पश्चिम बंगालची राजधानी कोलकाता येथे आयोजित केला जाईल. या वर्षीच्या कार्यक्रमाची संकल्पना "निरोगी वृद्धत्वासाठी योग" ही असून, यामध्ये शारीरिक आरोग्य, मानसिक स्वास्थ्य आणि निरोगी वृद्धत्व यांना प्रोत्साहन देण्यात योगाच्या भूमिकेवर प्रकाश टाकण्यात आला आहे.



## योगाला मुख्य प्रवाहात समाविष्ट करण्याचे प्रयत्न

स्वातंत्र्यानंतर भारतात सार्वजनिक आरोग्य कार्यक्रमांमध्ये योगाचा समावेश करण्याचे प्रयत्न झाले, परंतु हे प्रयत्न इतके संथ होते की त्या वेळी योगाला जितकी मिळायला हवी तितकी मान्यता मिळाली नाही. पहिली केंद्रीय योग संशोधन संस्था (सध्याची मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्था) 1976 मध्ये स्थापन करण्यात आली. केंद्रीय योग आणि निसर्गोपचार संशोधन परिषद 1978 मध्ये स्थापन करण्यात आली.

भारतीय वैद्यक आणि होमिओपॅथी विभागाचे 2003 मध्ये आयुष विभाग असे नामकरण करण्यात आले. तथापि, खरी सुरुवात 9 नोव्हेंबर 2014 रोजी झाली, जेव्हा आयुष क्षेत्रासाठी स्वतंत्र आयुष मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. एवढेच नव्हे तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संयुक्त राष्ट्रांमधील भाषणामुळे योगाला आंतरराष्ट्रीय मान्यता मिळाली आणि तो जगभरात एक जनआंदोलन म्हणून उदयास आला. इतकेच नव्हे तर, फेब्रुवारी 2016 मध्ये सरकारने एक विशेष मंडळ (राष्ट्रीय योग आणि निसर्गोपचार मंडळ) स्थापन केले. या उपक्रमांतर्गत, देशातील योग प्रशिक्षण सुधारण्यासाठी एम्स (AIIMS) आणि आयआयटी (IITs) सारख्या अग्रगण्य संस्थांमधील तज्ज्ञांना सहभागी करून घेण्यात आले आहे.

दरवर्षी जागतिक योग दिनाच्या आयोजनात भारत महत्त्वाची भूमिका बजावतो. नोडल मंत्रालय या नात्याने, आयुष मंत्रालय त्यासाठी सर्वसाधारण योग नियमावली देखील जारी करते. आशा कार्यकर्त्यांना प्रशिक्षण देऊन ग्रामीण भागात योगाला प्रोत्साहन देण्यासाठी पावले उचलण्यात आली आहेत.

*आजच्या धावपळीच्या आणि वेगवान जीवनात, योग मन, शरीर, बुद्धी आणि आत्मा यांना जोडून व्यक्तीच्या जीवनात शांती आणतो. तो व्यक्तीला कुटुंबाशी जोडून कुटुंबात आनंद आणतो. तो कुटुंबांना समाजाप्रती संवेदनशील बनवून समाजात सद्भावना निर्माण करतो. समाज राष्ट्राच्या एकतेचा धागा बनतो. अशी राष्ट्रे जगात शांती आणि सलोखा आणतात. बंधुभावाने मानवतेची भरभराट होते आणि तिचे पालनपोषण होते. म्हणजेच, योग व्यक्ती, कुटुंब, समाज, देश, जग आणि संपूर्ण मानवतेला जोडतो.*

**– नरेंद्र मोदी, पंतप्रधान**

आयुष मंत्रालय आणि क्रीडा मंत्रालयाने संयुक्तपणे योगाला प्रथमच एक स्पर्धात्मक खेळ म्हणून मान्यता देण्याचा उपक्रम सुरू केला आहे. 'फिट इंडिया चळवळी'चा एक भाग म्हणून योगाचा समावेश करण्यात आला आहे. योगाचा अभ्यास ही आता काळाची गरज आहे. या पार्श्वभूमीवर, एनसीईआरटीने आरोग्य आणि शारीरिक शिक्षणासोबतच इयत्ता पहिली ते दहावीच्या अभ्यासक्रमात योगाचा समावेश केला आहे. आयुष्मान भारत योजनेअंतर्गत 12,500 आयुष आरोग्य आणि कल्याण केंद्रांच्या माध्यमातून देशभरात योग प्रशिक्षणावर भर देण्यात आला आहे.

## योग 365...जेणेकरून योग केवळ वार्षिक उत्सव न राहता, दैनंदिन सरावाचा भाग होऊ शकेल

आंतरराष्ट्रीय योग दिन 2015 पासून साजरा करण्यास सुरुवात झाली, तेव्हापासून हा दिवस वेगाने जगातील सर्वात मोठ्या आरोग्य चळवळींपैकी एक बनला. आता केंद्र सरकार या दिनाला एक दिवसीय उत्सवाऐवजी दैनंदिन सवय बनवू इच्छित आहे. याच उद्देशाने योग 365 ची सुरुवात करण्यात आली आहे. लोकांमध्ये, संस्थांमध्ये आणि समुदायांमध्ये वर्षभर नियमितपणे योग साधनेची आवड निर्माण करणे हा यामागचा उद्देश आहे. नियमित लोकसहभाग, संस्थात्मक सहकार्य आणि डिजिटल माध्यमांच्या वापर याद्वारे योग 365 च्या माध्यमातून आरोग्य आणि कल्याणाला सर्वांसाठी सुलभ, सर्वसमावेशक आणि सवयीवर आधारित बनवण्याचाच हा प्रयत्न आहे. सरकारने या उपक्रमांतर्गत मोफत ऑनलाइन योग सत्रासाठी एक करारही केला आहे. याअंतर्गत दररोज सोप्या योग सत्रांचे आयोजन केले जाते.

## सामूहिक भुजंगासनाच्या आशिया विक्रमाची नोंद

21 जून या आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या आयोजनाच्या 50 दिवस आधी कान्हा शांती वनम इथे 6,000 पेक्षा जास्त सहभागींनी एकाच वेळी भुजंगासनाचा सराव केला. एक यश म्हणून या घटनेची, एशिया बुक ऑफ रेकॉर्ड्समध्ये, एकाच वेळी आसन करणाऱ्या सर्वात मोठ्या समूहाच्या रूपात नोंद केली गेली. यातून योग साधनेच्या माध्यमातून दिसून आलेला सामूहिक सहभाग आणि सामायिक कल्याणाच्या भावनेची प्रचिती येते.

## आतापर्यंत असे साजरे केले गेले आहेत आंतरराष्ट्रीय योग दिन

**वर्ष-2025**



विशाखापट्टणम इथे अधिकृत आयोजन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत 3 लाखांपेक्षा जास्त लोकांचा सहभाग, दोन गिनीज वर्ल्ड रेकॉर्डची नोंद. 1- एकाच ठिकाणी सर्वात मोठ्या योग सत्राचा, 2- सामूहिक सूर्यनमस्काराचा.

**संकल्पना : एक पृथ्वी, एक आरोग्यासाठी योग**

**वर्ष-2024**



श्रीनगर इथे आयोजित योग कार्यक्रमाची संकल्पना वैयक्तिक आणि सामाजिक कल्याणाला चालना देण्यावर आधारित होती.

**संकल्पना : स्वतःसाठी आणि समाजासाठी योग**

**वर्ष-2023**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 2023 मध्ये संयुक्त राष्ट्राच्या मुख्यालयातील उत्सवाचे नेतृत्व केले होते. योग उत्सवात 135 देशांचा सहभाग.

**संकल्पना : वसुधैव कुटुम्बकम् साठी योग**

**वर्ष-2022**



कर्नाटकच्या मैसूर इथे इतर सहभागींसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केली होती योग साधना.

**संकल्पना : मानवतेसाठी योग**


**वर्ष-2021**



जागतिक महामारी असल्याने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आभासी पद्धतीने संबोधित केले होते. जागतिक आरोग्य संघटनेच्या - एम योग ॲपचे अनावरण.

**संकल्पना : आरोग्यासाठी योग**

**वर्ष-2020**



कोविडच्या जागतिक संकटामुळे सार्वजनिक समारंभ झाला नाही, परंतु आभासी पद्धतीने आयोजन झाले.

**संकल्पना : घरातच योग आणि कुटुंबासोबत योग.**

**वर्ष-2019**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रांची इथे सहभागींसोबत साजरा केला होता योग दिन.

**संकल्पना : हृदयाच्या काळजीसाठी योग**

**वर्ष-2018**



डेहराडून इथे 50 हजार सहभागींसोबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केला होता योग

**संकल्पना : शांततेसाठी योग**

**वर्ष-2017**



51 हजार सहभागींसोबत लखनऊमध्ये साजरा केला गेला, इथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जीवनशैलीमधील योग साधनेच्या महत्त्व या विषयावर चर्चा केली.

**संकल्पना : आरोग्यासाठी योग**

**वर्ष-2016**



चंदीगड इथे अधिकृत आयोजन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत 30 हजार लोकांनीही सहभाग नोंदवला.

**संकल्पना : शाश्वत विकासाची उद्दिष्टे साध्य करण्यासाठी योग**

**वर्ष-2015**



नवी दिल्लीत कर्तव्य पथ इथे आयोजन, या आयोजनात 35,985 जणांनी भाग घेतला. दोन गिनीज वर्ल्ड रेकॉर्डची नोंद.

**संकल्पना : सौहार्द आणि शांततेसाठी योग**

**आंतरराष्ट्रीय योग दिन 2026 ची संकल्पना : 'आरोग्यसंपन्न वृद्धत्वासाठी योग'**

## मानवी संस्कृतीचा अमर वारसा

आज डेहराडूनपासून डब्लिनपर्यंत, शांघायपासून शिकागोपर्यंत, जकार्तापासून जोहान्सबर्गपर्यंत, सर्वत्र योगच योग आहे ही भारतीयांसाठी अभिमानाची गोष्ट आहे. हिमालयातील हजारो फूट उंच पर्वत असोत वा उन्हाने तापलेले वाळवंट, योग प्रत्येक परिस्थितीत, प्रत्येक जीवाला समृद्ध करते आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणतात,

"जेव्हा तोडणाऱ्या शक्ती वरचढ ठरतात तेव्हा विखुरलेपण येते. व्यक्तींमध्ये, समाजांमध्ये, देशांमध्ये विखुरलेपण येते. समाजात भिंती उभ्या राहतात, कुटुंबात कलह वाढतो आणि इतकेच नाही तर व्यक्ती आतून तुटते आणि जगण्यात तणाव वाढत जातो. या विखुरलेपणाच्या काळात योग जोडतो. जोडण्याचे काम करतो."

योग साधनेमुळे अनेक नवीन योग संस्था उभ्या राहात आहेत. योग प्रशिक्षकांची मागणी वाढली आहे. योग संस्थांमध्ये देखील आज युवा वर्ग याला एक व्यवसाय म्हणून स्वीकारून त्यासाठी स्वतःला तयार करू लागले आहेत. जगातील देशांमध्ये भारतीय योग प्रशिक्षकांची मागणी वाढत आहे. जगात रोजगाराची एक नवीन बाजारपेठ योग साधनेमुळे तयार झाली आहे. या सर्वांमध्ये भारतातील लोकांना जगात सर्वात पहिली पसंती दिली जाते. काही वर्षांपूर्वीच युनेस्कोनेही भारतातील योग साधनेला मानवी संस्कृतीचा एक अमर वारसा म्हणून मान्यता दिली आहे. जगभरातील संस्था, शाळा, महाविद्यालयांमध्ये योग प्रशिक्षणाचा अंतर्भाव केला जात आहे. भावी पिढी या शतकानुशतके जुन्या विज्ञानाशी परिचित व्हावी, त्यांनी या साधनेचा सराव करावा आणि तो त्यांच्या जीवनाचा भाग बनावा या उद्देशाने आज देशातही अनेक राज्ये अशी आहेत ज्यांनी योग साधनेला शिक्षणाचा एक भाग बनवले आहे.

## भारताची सॉफ्ट पॉवर बनला योग

योग साधनेला मिळालेल्या जागतिक मान्यतेमुळे भारताला एक सॉफ्ट पॉवर अशी ओळख मिळाली आहे. कोणत्याही देशाची बौद्धिक आणि सांस्कृतिक सामर्थ्यातून (सॉफ्ट पॉवर) त्या देशाच्या समाजाच्या रचनात्मक आकांक्षांची प्रचिती येत असते आणि सरकार त्या पुढे नेण्यात केवळ मदत करू शकते. 2014 पूर्वीही लोक परदेशात योग साधना करत होते, परंतु पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रेरणेने जेव्हा संयुक्त राष्ट्राने याला आंतरराष्ट्रीय योग दिन म्हणून घोषित केले, तेव्हा हा एक जागतिक उत्सव बनला. आज हा जगातील सर्वात मोठा सांस्कृतिक उत्सव आहे. योग साधनेची सुरुवात भारतात झाली होती, हे एक असे तंत्र आहे, ज्याचा कोणीही मोफत वापर करू शकतो.





## योग साधनेची वाढती बाजारपेठ

- भारतात योग साधनेचा इतिहास सुमारे 5 हजार वर्षे जुना आहे.
- अलाईड मार्केट रिसर्चच्या एका अहवालानुसार, 2019 मध्ये 37.5 अब्ज डॉलरची होती जागतिक बाजारपेठ.

2027 मध्ये योग साधनेची जागतिक बाजारपेठ पोहचेल **66.4** अब्ज डॉलरपर्यंत

2021 मधील जागतिक स्तरावरील योग पर्यटनाच्या बाजारपेठेविषयी वर्तवलेला अंदाज **156.11** अब्ज डॉलर इतका

www.grand-viewresearch.com च्या एका संशोधनपर अभ्यासानुसार 2022-2030 दरम्यान या बाजारपेठेची वार्षिक वृद्धीच्या दराचा वर्तवलेला अंदाज **5.8%** इतका





योग साधना करतानाचे चित्र असलेले सिंधू-सरस्वती खोऱ्यातील संस्कृतीचे अवशेष आणि मुद्रेतून देशातील योग साधनेच्या अस्तित्वाचे संकेत मिळतात.

## योग साधनेची वाढती व्याप्ती

**6+**
लाख योग स्वयंसेवकांना मोरारजी देसाई राष्ट्रीय योग संस्थेने प्रशिक्षित केले

**7+**
लाख योग व्यावसायिक आणि स्वयंसेवकांना योग प्रमाणन मंडळाच्या आराखड्याअंतर्गत प्रमाणित केले गेले आहे

**70+** निसर्गोपचार आणि योग विज्ञानातील पदवी महाविद्यालये

**5,000+**
योग प्रशिक्षण संस्था

**190+**
देशांमध्ये आता साजरा केला जातो आंतरराष्ट्रीय योग दिन

राष्ट्रीय सर्वेक्षणानुसार देशातील

**2.5** कोटी कुटुंबांमध्ये दररोज किमान एक व्यक्ती योग साधना करते.



योग साधनेच्या जागतिक लोकप्रियतेमुळे गेल्या दशकभरात आंतरराष्ट्रीय योग बाजारपेठेत 5 पटीने वाढ झाली आहे.

पहिला आंतरराष्ट्रीय जागतिक योग दिन 21 जून 2015 रोजी साजरा केला गेला होता. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी योग साधनेची वैशिष्ट्ये आणि लाभांचा जोरदार प्रचार करत या साधनेला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली. आज जगभरात योग साधनेला भारताचे सामर्थ्य म्हणून पाहिले जाते. हे लोक-कल्याणाचे असे वरदान आहे, जे भारताने जगाला दिले आहे.

आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या व्यापकतेने प्रत्येक नागरिकाला ही जाणीव करून दिली आहे कि राष्ट्र उभारणीच्या प्रत्येक प्रक्रियेशी, प्रत्येक उपक्रमाशी जोडले जाण्यासाठी आपण सर्वांनी आरोग्यसंपन्न असणे गरजेचे आहे. चांगल्या आरोग्य विषयक सुविधांमुळे सरासरी आयुर्मान वाढले असल्याबद्दल क्वचितच कोणाच्या मनात शंका असू शकेल. यामुळे भारताच्या विकासाचा वेगही वाढला आहे. वाढलेली कार्यक्षमता कर्मयोगात परावर्तीत झाली आहे. आयुर्मानाच्या सरासरी वयात एका वर्षाची जरी वाढ झाली तरी देशाच्या सकल देशांतर्गत उत्पादनात 4 टक्क्यांची वाढ होत असते, यावरूनच आरोग्यसंपन्न जीवन देशाच्या आर्थिक आरोग्यासाठी किती महत्त्वाचे असते, याचा अंदाज बांधला जाऊ शकतो.







**51,000 पेक्षा जास्त नियुक्तीपत्रांचे वितरण**

# युवा वर्गाची अविरत प्रगती विकसित भारताची शक्ती

*देशाच्या युवा वर्गाला नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी केंद्र सरकार वचनबद्ध आहे. या दिशेनेच रोजगार मेळा हा एक महत्त्वाचा उपक्रम आहे. देशभरात आतापर्यंत 19 रोजगार मेळ्यांचे आयोजन करण्यात आले असून याअंतर्गत युवा वर्गाला 12 लाखांपेक्षा जास्त नियुक्तीपत्रे प्रदान केली गेली आहेत. 23 मे रोजी देशभरात 47 ठिकाणी आयोजित 19 व्या रोजगार मेळ्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शासकीय नोकरी मिळवलेल्या 51 हजारपेक्षा जास्त युवा उमेदवारांना नियुक्तीपत्रे वितरित केली...*

देशाचा युवा वर्ग विकसित भारताच्या वाटचालीला पुढची दिशा देण्यात महत्त्वाची भूमिका बजावतो आहे. आज प्रत्येक भारतीय एका मोठ्या संकल्पासोबत पुढची वाटचाल करतो आहे. हा संकल्प 2047 पर्यंत विकसित भारत घडवण्याचा आहे. रोजगार मेळ्यात नियुक्तीपत्र वितरणादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले होते की, अनेक मोहिमांअंतर्गत देशाचे सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्र मिळून खूप मोठी गुंतवणूक करत आहेत. ही गुंतवणूक देशातील युवा वर्गाला देशातच नोकरीची देत आहे, त्यांची स्वप्ने पूर्ण करत आहे. नियुक्तीपत्र मिळाल्यानंतर सरकारी कर्मचारी अशी तुमची ओळख निर्माण होईल. अशा वेळी तुम्हाला कायम हे लक्षात ठेवायचे आहे की व्यवसाय सुलभता देशाच्या किती मोठ्या प्राधान्यक्रमावर आहे.

आज भारताच्या युवा वर्गाकडे ज्या प्रकारे प्रगती करण्याच्या, आपली स्वप्ने पूर्ण करण्याच्या संधी आहेत, अशा संधी पूर्वी कधी मिळाल्या नव्हत्या. आज उत्पादन,तंत्रज्ञान, स्टार्टअप, डिजिटल सेवा, रेल्वे, संरक्षण, अंतराळ, अशा अनेक क्षेत्रांमध्ये अगणित संधी देशातील युवा वर्गाची वाट पाहत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमात सांगितले की, जास्तीत जास्त युवा प्रतिनिधींना नवीन संधींचा लाभ घेता यावा आणि त्यांना आपली प्रतिभा दाखवण्याची पूर्ण संधी मिळावी हाच सरकारचा प्रयत्न आहे. म्हणूनच कौशल्य विकास, उद्योग-आधारित

> *आज देशाचा युवा वर्ग जगातील प्रत्येक क्षेत्रात आपली ओळख निर्माण करतो आहे. हाच उत्साह, हीच ऊर्जा लोकसेवेच्या बाबतीतही दिसून आली पाहिजे. विकसित भारत अशाच युवा वर्गाच्या प्रयत्नातून घडेल, जे आपल्या कामाला देशसेवेचे माध्यम मानतात.*
>
> **-नरेंद्र मोदी, पंतप्रधान**


## विविध मंत्रालयांमध्ये आणि विभागांमध्ये काम करतील निवड झालेले कर्मचारी

19 व्या रोजगार मेळ्यात देशाच्या सर्व भागांतून निवडलेल्या ज्या नवनियुक्त उमेदवारांना नियुक्तीपत्र देण्यात आली आहेत, ते रेल्वे मंत्रालय, गृह मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालय, वित्तीय सेवा विभाग, उच्च शिक्षण विभाग अशा विभागांसह केंद्र सरकारच्या विविध मंत्रालयांमध्ये आणि विभागांमध्ये आपला कार्यभार स्वीकारतील.

## युवा शक्तीला नवीन संधी देण्यासाठी सरकार वचनबद्ध

- केंद्र सरकार आणि सहयोगी राज्य सरकारांद्वारे लाखो नोकऱ्यांच्या नियुक्तीपत्रांचे वितरण.
- महिला, दिव्यांग व्यक्ती आणि आकांक्षी जिल्ह्यांतील उमेदवारांना विशेष लाभ.
- यूपीएससी, एसएससी, रेल्वे भरती मंडळ आणि आयबीपीएस यांसारख्या प्रतिष्ठित परीक्षांच्या माध्यमातून नियुक्त्या.
- समान संधींसाठी 13 प्रादेशिक भाषांमध्ये भरती परीक्षांची सुविधा.
- I-GOT कर्मयोगी पोर्टलवर 4,800 पेक्षा जास्त उच्च दर्जाच्या ई-लर्निंग अभ्यासक्रमांच्या माध्यमातून 1.65 कोटींपेक्षा जास्त कर्मचारी प्रशिक्षण घेत आहेत.
- पारदर्शक आणि गुणवत्तेवर आधारित भरती प्रक्रियेमुळे युवा वर्गाच्या स्वप्नांना नवी भरारी.

## युवा वर्गाला सरकारी नोकरी देण्यासाठी रोजगार मेळा




पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा.

शिक्षण आणि भविष्यातील तंत्रज्ञानावर सातत्याने भर दिला जात आहे. भारतीय तंत्रज्ञान संस्थेला आधुनिक, तर राष्ट्रीय कौशल्य प्रशिक्षण संस्थेला बळकट केले जात आहे. प्रधानमंत्री सेतू सारख्या मोहिमा याच दिशेने काम करत आहेत.

### विस्तारत आहेत देशातील नागरिकांच्या आकांक्षा

आज देशातील नागरिकांच्या आकांक्षा खूप विस्तारल्या आहेत. ही बाब विकासाच्या सकारात्मक संकेतांसारखीच आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या कार्यक्रमात सांगितले, की आपल्याला आपल्या देशातील नागरिकांच्या आकांक्षा समजून घ्यायच्या आहेत. त्यानुसार तितक्याच वेगवान गतीने कामही करायचे आहे. अशा परिस्थितीत लोकसेवेत येणाऱ्या युवा वर्गाची भूमिका खूप महत्त्वाची झाली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी युवा वर्गाला आवाहन केले की, तुम्हाला सातत्यपूर्णतेने शिकत राहावे लागेल. स्वतःला नवीन तंत्रज्ञान, नवीन व्यवस्था आणि नवीन गरजांनुसार तयार करावे लागेल. यासाठी तुम्हाला iGOT कर्मयोगी प्लॅटफॉर्मची मोठी मदत मिळेल. कर्मयोगी प्रारंभ यासारख्या मॉड्यूलमुळे तुम्हाला तुमची जबाबदारी सुलभतेने समजून घेता येईल. माझे तुम्हा सर्वांना आवाहन आहे की याचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. ▪

केंद्रीय मंत्रिमंडळाचे निर्णय

# अन्न सुरक्षा आणि स्वच्छ वाहतुकीला नवीन गती

*केंद्र सरकार गरीब कल्याणकारी योजनांना तंत्रज्ञानाने सुसज्ज करत अधिक पारदर्शक आणि सोयीसुविधायुक्त बनवत आहे. याच दिशेने केंद्रीय मंत्रिमंडळाने सार्थक पीडीएस फेज-2 साठी 25,530 कोटी रुपयांना मंजुरी दिली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ताधारीत लाभार्थी भांडाराची निर्मिती, जीपीएस ट्रॅकिंग आणि क्यूआर कोड टॅगिंग यांसारख्या उच्च तंत्रज्ञानाधारीत व्यवस्थांच्या माध्यमातून गरिबांपर्यंत स्वस्त धान्य आणि इतर योजनांचा शंभर टक्के लाभ पोहोचवला जाईल. यासोबतच, पायाभूत सुविधांव्यतिरिक्त दिल्ली - राष्ट्रीय राजधानी क्षेत्रात जुने ट्रक आणि बस बदलण्याच्या योजनेसह इतर अनेक प्रस्तावांना मंजुरी दिली गेली आहे.....*



**निर्णय : दिल्ली - राष्ट्रीय राजधानी क्षेत्रामधील जुने ट्रक आणि बस बीएस-VI मानके अथवा इलेक्ट्रिक वाहनांनी बदलले जाणार, योजनेला मंजुरी.**

**प्रभाव :** दिल्ली-राष्ट्रीय राजधानी क्षेत्रामधील सुमारे 1.91 लाख ट्रक आणि 16,329 बस बदलल्या गेल्यावर वाहन मालकांना या योजनेचा लाभ मिळेल. हा उपक्रम या प्रदेशातील वायू प्रदूषण कमी करण्यात महत्त्वाचे योगदान देईल. पर्यावरणपूरक वाहतूक व्यवस्थेला चालना मिळेल आणि या प्रदेशातील हवेच्या गुणवत्तेत सुधारणा घडून येईल.

**निर्णय : ओदिशामध्ये रामेश्वर ते पारादीपपर्यंत नवीन किनारपट्टी महामार्गाच्या (दोन टप्प्यात निर्मिती, एकूण 160.18 किलोमीटर लांबीच्या किनारपट्टी महामार्गाचा भाग) बांधकामाला हायब्रिड ॲन्युइटी तत्वावर मंजुरी.**

**प्रभाव :** याची एकूण लांबी 160.18 किलोमीटर आहे. या प्रकल्पासाठी 8300.79 कोटी रुपये खर्च होण्याचा अंदाज आहे. हे प्रकल्प प्रधानमंत्री गतिशक्ती अंतर्गतच्या तत्त्वांना अनुसरून आहेत. 9 इकॉनॉमिक नोड्स आणि 5 लॉजिस्टिक नोड्स परस्परांशी जोडले जातील. यामुळे देशाच्या लॉजिस्टिक परफॉर्मन्स इंडेक्सवर (LPI) सकारात्मक परिणाम दिसून होईल.

- हा प्रकल्प जेव्हा पूर्ण होईल, तेव्हा रामेश्वर आणि पारादीप दरम्यानच्या प्रवासाची वेळ सुमारे 2 तास 30 मिनिटांनी कमी होईल अशी अपेक्षा आहे. प्रवासी आणि मालवाहतूक दोघांसाठी सुरक्षित, जलद आणि विनाअडथळा जोडणीची सुनिश्चिती होईल. या प्रकल्पामुळे इंधनाचा वापर, कार्बन उत्सर्जन आणि वाहनाच्या कार्यान्वयनासंबंधीच्या खर्चातही घट होईल.

**निर्णय : बिहारमधील एनएच-31 आणि एनएच-231 च्या खगरिया-पूर्णिया या टप्प्याचे (143.529 किलोमीटर) बीओटी (टोल) तत्वावर 3,936.05 कोटी रुपये खर्चासह 4-पदरी मानकांअंतर्गत अद्ययावतीकरण करण्याला मंजुरी.**

**प्रभाव :** यामुळे खगरिया, भागलपुर, कटिहार आणि पूर्णिया जिल्ह्यांमधील शहरी भागांतील गंभीर भौगोलिक त्रुटी, तीव्र स्वरुपाची वळणे आणि गर्दीच्या समस्येचे निवारण होईल. या प्रकल्पाअंतर्गत पूर्णिया शहरासाठी सुमारे 7 किलोमीटर लांबीचा विस्तृत हरीतक्षेत्र बायपास देखील बांधला जाईल. या प्रकल्पामुळे प्रवासाचा सरासरी वेग वाढण्यासोबतच, प्रवासाची वेळही सुमारे दोन तासांनी कमी होईल. रस्ते सुरक्षा, इंधन कार्यक्षमता आणि वाहनाच्या कार्यान्वयनासंबंधीच्या खर्चातही सुधारणा घडून येईल.

**निर्णय : 'रेशन परिवहन, हँडलिंग आणि पीडीएस ऑटोमेशन सहाय्य योजना' (सार्थक-पीडीएस ) ही एकात्मिक छत्री योजना म्हणून सुरू ठेवण्यास मंजुरी.**

**प्रभाव :**

- खाद्यान्न अन्नधान्य वाहतूक सहाय्य आणि आधुनिक सार्वजनिक वितरण प्रणाली (पीडीएस) या योजनांचे एकत्रिकरण करून त्याला 'सार्थक-पीडीएस' असे नाव देण्यात आले आहे.
- राज्यांतर्गत अन्नधान्याची वाहतूक आणि हाताळणीवर, राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी केलेल्या खर्चासाठीच्या केंद्रीय सहाय्य निकषांमध्ये सुधारणा.
- विद्यमान केंद्रीय आर्थिक सहाय्य तसेच रास्त भाव धान्य दुकान (एफपीएस) विक्रेत्यांना देण्यात येणारे मार्जिन सहाय्य (सेवा मोबदला) पुढेही कायम ठेवण्यात येईल.
- अधिक प्रभावी, पारदर्शक आणि तंत्रज्ञानावर आधारित 'पीडीएस' वितरणावर विशेष भर.
- राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम-एनएफएसए च्या प्रभावी अंमलबजावणीला बळकटी देण्यासाठी एकात्मिक आणि परस्पर-सुसंगत 'पीडीएस' संरचना विकसित केली जाईल.
- 'पीडीएस' कामकाजाच्या आधुनिकीकरणासाठी आर्टिफिशियल इंटेलिजन्स, मशीन लर्निंग, नॅचरल लँग्वेज प्रोसेसिंग आणि ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल.



**₹25,530**

**कोटी रुपयांच्या केंद्रीय खर्चाला 16 व्या वित्त आयोगाच्या कालावधीसाठी मंजुरी प्रदान करण्यात आली आहे.**

**81.35**

**कोटी राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियम (एनएफएसए) लाभार्थ्यांच्या अन्न सुरक्षेसाठी साहाय्यक ठरेल.**

***ही योजना 31 मार्च 2031 पर्यंत चालवली जाईल.***

- रिअल-टाइम मॉनिटरिंग (थेट देखरेख) आणि **'AI'** आधारित तक्रार निवारण प्रणाली विकसित केली जाईल.
- राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये आधार संलग्नीकरण, ई-पीओएस प्रणालीचे स्वयंचलनीकरण आणि संगणकीकृत पुरवठा साखळी व्यवस्थापनाचा विस्तार करण्यात येईल.

**निर्णय : अनुसूचित भारतीय विमान सेवांना देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय उड्डाणांसाठी एटीएफच्या किमतींमध्ये स्थैर्य राखण्यात मदत करण्याच्या उद्देशाने तेल विपणन कंपन्यांना (OMCs) 10,000 कोटी रुपयांपर्यंतच्या एकरकमी अर्थसंकल्पीय सहाय्याला मंजुरी.**

**प्रभाव :** हे अर्थसंकल्पीय सहाय्य पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या अनुदान मागण्यांद्वारे तेल विपणन कंपन्यांना व्याजमुक्त आगाऊ रक्कम म्हणून प्रदान करण्यात येईल.पश्चिम आशिया संकटा मुळे इंधनाच्या किमतींमध्ये अभूतपूर्व अस्थिरता निर्माण झाली आहे. या काळात विमान टर्बाइन इंधनाच्या किमती स्थिर राखण्यासाठी, तेल विपणन कंपन्यांना हे सहाय्य दिले जाईल.

**निर्णय : राष्ट्रीय महामार्ग एनएच-63 च्या विद्यमान आर्मूर-जगतियाल-मंचरियाल खंड टप्प्याला 'हायब्रिड ॲन्युइटी मॉडेल' अंतर्गत आणि राष्ट्रीय महामार्ग एनएच-563 च्या जगतियाल-करीमनगर या टप्प्याचे 'बिल्ड-ऑपरेट-ट्रान्सफर' पद्धतीनुसार (पथकर) चौपदरी मार्गिकेच्या मानकांनुसार रुंद करण्यास मंजुरी.**

**प्रभाव :** या टप्प्याची एकूण लांबी 190.76 किलोमीटर आहे. या प्रकल्पावर 7,500 कोटी रुपये खर्च होण्याचा अंदाज आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यावर प्रवासाच्या वेळेत बचत होईल. सुरक्षित, जलद आणि विनाअडथळा दळणवळण सुनिश्चित होईल. या प्रकल्पामुळे इंधनाचा वापर, कार्बन उत्सर्जन आणि वाहन चालवण्याचा खर्च देखील लक्षणीयरीत्या कमी होईल.

**निर्णय : मध्य प्रदेशातील 'एनएच-347 बी' या राष्ट्रीय महामार्गा च्या 125 किलोमीटर लांबीच्या हिवारखेडी-रोशनी-आशापुर-रुधी टप्प्याचे दुपदरी मार्गिकांमध्ये रुपांतरण करण्यास आणि सुमारे 109 किलोमीटरच्या देशगाव-जुलवानिया टप्प्याला चौपदरी बनवण्याच्या प्रकल्पाला मंजुरी. याचे बांधकाम 'हायब्रिड ॲन्युइटी मॉडेल' द्वारे केले जाईल.**

**प्रभाव :** या प्रकल्पावर अंदाजे 4,415.60 कोटी रुपये खर्च केले जातील. या प्रकल्पामुळे प्रवासाचा सरासरी वेग आणि दळणवळण वाढेल. रस्ते सुरक्षा, इंधन कार्यक्षमता आणि वाहन चालवण्याच्या खर्चात सुधारणा होईल. हा प्रकल्प मध्य प्रदेशातील प्रमुख आर्थिक, सामाजिक आणि लॉजिस्टिक्स केंद्रांना विनाअडथळा जोडेल.

मंत्रिमंडळाचे निर्णय आणि पत्रकार परिषद पाहण्यासाठी 'क्यू आर' कोड स्कॅन करा.




गौरव सोहळ्याचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी 'क्यू आर' कोड स्कॅन करा.

**पद्म पुरस्कार 2026**

# राष्ट्राच्या नायकांचे अभिनंदन...

*राष्ट्रपती भवनातील गणतंत्र मंडप पुन्हा एकदा देशातील अनोखी प्रतिभा, असामान्य सेवा आणि दुर्दम्य साहसाच्या तेजाने उजळून निघाला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांनी 25 मे रोजी आयोजित एका भव्य नागरी सन्मान सोहळ्यात 2026 या वर्षासाठी निवडलेल्या 131 पैकी 66 व्यक्तींचा प्रतिष्ठितेच्या पद्मविभूषण, पद्मभूषण आणि पद्मश्री पुरस्कारांनी केला गौरव...*

या सोहळ्याच्या पहिल्या टप्प्यात 2 पद्मविभूषण, 6 पद्मभूषण आणि 58 पद्मश्री पुरस्कार प्रदान करण्यात आले. हा सोहळा केवळ पुरस्कार वितरणापुरता मर्यादित नव्हता, तर तळागाळात कार्य करून देशात सकारात्मक परिवर्तन घडवून आणणाऱ्या नायकांच्या तपस्येचा गौरव करणारा उत्सव होता. राष्ट्रपती भवनात आयोजित या समारंभात कला, साहित्य, समाजसेवा, विज्ञान, उद्योग अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान देऊन भारताची मान उंचावणाऱ्या देशातील सुपुत्र आणि सुपुत्रींचा सन्मान करण्यात आला. ही कथा अशा असामान्य व्यक्तिमत्त्वांची आहे, ज्यांच्या प्रेरणादायक जीवनप्रवासाने त्यांना आज देशाच्या सर्वोच्च नागरी सन्मानांमध्ये मानाचे स्थान मिळवून दिले आहे. केंद्र सरकारने याच वर्षी 25 जानेवारी रोजी 131 पद्म पुरस्कार विजेत्यांच्या नावांची घोषणा केली होती.



## पद्मविभूषण



## धर्मेंद्र सिंह देओल (मरणोत्तर)

भारतीय चित्रपटसृष्टीतील एक महान व्यक्तिमत्त्व आणि माजी खासदार होते. हिंदी चित्रपट उद्योगाच्या इतिहासात त्यांना बहुमुखी आणि व्यावसायिकदृष्ट्या यशस्वी अभिनेत्यांपैकी एक मानले जाते. बॉलीवूडचे 'ही मॅन' म्हणून ते लोकप्रिय होते आणि त्यांची सहा दशकांहून अधिक काळची कारकीर्द अत्यंत नेत्रदीपक राहिली आहे. त्यांनी 300 हून अधिक चित्रपटांत अभिनय केला. हिंदी चित्रपटसृष्टीत सर्वाधिक गाजलेल्या चित्रपटांचा विक्रम त्यांनी प्रस्थापित केला. कलेप्रती असलेल्या त्यांच्या आयुष्यभराच्या समर्पणासाठी त्यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कार आणि सन्मान प्राप्त झाले. बॉलीवूडमधील त्यांच्या अफाट योगदानासाठी त्यांना 1997 मध्ये 'फिल्मफेअर लाइफटाइम अचीव्हमेंट अवॉर्ड' या जीवनगौरव पुरस्काराने गौरवण्यात आले. वर्ष 2012 मध्ये त्यांना देशाचा तिसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'पद्मभूषण' प्रदान करण्यात आला होता. आपल्या यशस्वी सिने- प्रवासाव्यतिरिक्त, धर्मेंद्र वर्ष 2004 ते 2009 पर्यंत राजस्थानच्या बीकानेरमधून लोकसभा खासदार देखील होते. 8 डिसेंबर, 1939 रोजी पंजाबमधील नसराली येथे त्यांचा जन्म झाला होता.



## पद्मश्री

- विश्वबन्धु (मरणोत्तर)
- भारत सिंह भारती
- तगा राम भील
- हरमनप्रीत कौर भुल्लर
- रतीलाल मोहनलाल बोरिसागर
- कुमार बोस
- जनार्दन बापूराव बोथे
- स्वामी ब्रह्मदेव
- प्रोसेन जीत चटर्जी
- देवकी अम्मा जी
- डॉ. रामचंद्र गोडबोले
- सुनीता गोडबोले
- तेची गुबिन
- डॉ. एच. वी. हण्डे
- गफरुद्दीन मेवाती जोगी
- मीर हाजी कासम
- रघुवीर खेडकर
- आर. कृष्णन किटना (मरणोत्तर)
- प्रा. डॉ. लार्स-क्रिश्चियन कोच
- प्रा. मामिडाला जगदीश कुमार
- प्रवीण कुमार
- के. विजय कुमार
- श्रीरंग देवबा लाड
- अंके गौड़ा एम
- प्राध्यापक (डॉ.) सरोज मंडल
- प्रा. बुद्ध रश्मि मणि
- निलेश विनोदचंद्रा मांडलेवाला
- डॉ. महेन्द्र कुमार मिश्रा
- तृप्ति मुखर्जी



## पद्मविभूषण



### डॉ. (श्रीमती) एन. राजम्

संगीत क्षेत्रातील एक अत्यंत उत्कृष्ट आणि प्रतिष्ठित कलाकार तसेच व्हायोलिन वादक (व्हायोलिन कलाविज्ञ) आहेत. त्यांच्या बोटांनी व्हायोलिनच्या तारा छेडताच एक अप्रतिम समा बांधला जातो. त्यांनी व्हायोलिनवर संगीताची गायन शैली सादर करणाऱ्या 'गायकी अंग' नामक तंत्राची सुरुवात करून शास्त्रीय संगीताला एक क्रांतिकारक दृष्टिकोन दिला, त्यामुळे त्या जगभरात 'सिंगिंग व्हायोलिन' (गाणारे व्हायोलिन) म्हणून प्रसिद्ध झाल्या. 16 मार्च 1939 रोजी एर्नाकुलम येथील संगीत परंपरेचा वारसा लाभलेल्या एका कुटुंबात जन्मलेल्या डॉ. राजम् यांनी त्यांचे वडील विद्वान ए. नारायण अय्यर यांच्याकडून संगीताचे शिक्षण घेतले. आपल्या सादरीकरणाच्या कारकिर्दीव्यतिरिक्त, डॉ. राजम् या जवळपास चार दशके बनारस हिंदू विद्यापीठाच्या प्रदर्शन कला शिक्षण शाखा समुहात प्राध्यापक होत्या. त्या विभागाच्या प्रमुख आणि नंतर शाखा समुहाच्या अधिष्ठाता बनल्या. डॉ. राजम् यांनी अमेरिका, कॅनडा, रशिया, फ्रान्स, इटली आणि संपूर्ण युरोपसह जगभरात मोठ्या प्रमाणावर कलाविष्कार सादर केले आहेत. डॉ. राजम् यांना अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांनी गौरवण्यात आले आहे. हिंदुस्थानी संगीतासाठी त्यांना 1984 या वर्षात पद्मश्री, 2004 मध्ये पद्मभूषण, आणि 1990 मध्ये 'संगीत नाटक अकादमी पुरस्कारा'ने गौरवण्यात आले.



## पद्मभूषण



### शतावधानी डॉ. आर. गणेश

शतावधानी डॉ. आर. गणेश हे भारतातील 'अवधान' या अनोख्या शास्त्रीय कलेचे तज्ज्ञ आहेत. या कलेमध्ये कोणत्याही पेन किंवा कागदाचा वापर न करता, तत्क्षणी छंदबद्ध काव्यरचना करणे आणि विविध काव्यात्मक तसेच बौद्धिक आव्हानांना उत्तर देणे अपेक्षित असते. ही कला सर्जनशीलता आणि विद्वत्तेची अत्यंत उच्च पातळीवर कसोटी पाहते. 4 डिसेंबर 1962 रोजी कर्नाटकच्या कोलारमध्ये जन्मलेल्या डॉ. गणेश यांनी मेकॅनिकल इंजिनिअरिंगमध्ये पदवी, संस्कृतमध्ये पदव्युत्तर पदवी आणि कन्नडमध्ये डी. लिट. ही पदवी प्राप्त केली आहे. ते काव्यशास्त्र, छंदशास्त्र, साहित्य, तत्त्वज्ञान आणि शास्त्रीय कलांचे गाढे विद्वान आहेत. त्यांनी साहित्यासोबतच संगीत, नृत्य आणि रंगभूमी यामध्येही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. कन्नड भाषेतील त्यांची 15,000 तासांपेक्षा अधिक व्याख्याने ऑनलाइन उपलब्ध आहेत.



## पद्मभूषण



## भगत सिंह कोश्यारी

उत्तराखंडमध्ये 'भगत दा' या नावाने ओळखले जाणारे भगत सिंह कोश्यारी हे एक प्रतिष्ठित समाजसेवक, शिक्षणतज्ज्ञ, पत्रकार आणि राष्ट्रवाद जपणारे नेते आहेत. त्यांनी आपले संपूर्ण जीवन जनसेवा तसेच गरीब आणि वंचित घटकांच्या उत्थानासाठी समर्पित केले आहे. 17 जून 1942 रोजी उत्तराखंडच्या बागेश्वर जिल्ह्यातील पलानधुरा गावात जन्मलेल्या कोश्यारी यांनी 1964 मध्ये इंग्रजी साहित्यात पदव्युत्तर पदवी प्राप्त केली. त्यांनी आपल्या कारकिर्दीची सुरुवात व्याख्याता म्हणून केली, परंतु नंतर त्यांनी स्वतःला पूर्णपणे शिक्षण आणि समाजसेवेसाठी वाहून घेतले. 1997 मध्ये ते उत्तर प्रदेश विधान परिषदेचे सदस्य बनले. उत्तराखंड राज्याच्या निर्मितीनंतर ते राज्याच्या पहिल्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री आणि त्यानंतर मुख्यमंत्री झाले. ते राज्यसभा खासदार, लोकसभा खासदार, महाराष्ट्राचे राज्यपाल तसेच अतिरिक्त कार्यभार म्हणून गोव्याचे राज्यपाल देखील राहिले आहेत.



## पद्मश्री

- हरि माधव मुखोपाध्याय (मरणोत्तर)
- डॉ. ए. ई. मुथुनायगम
- सत्यनारायण नंदलाल नुवाल
- के. पजानिवेल
- धर्मिकलाल चुनीलाल पंड्या
- कैलाश चन्द्र पंत
- गरिमेला बालकृष्ण प्रसाद (मरणोत्तर)
- प्रा. (डॉ.) राजेंद्र प्रसाद
- डॉ. गुडुरु वेंकट राव
- दीपिका रेड्डी
- डॉ. पालकोंडा विजय आनंद रेड्डी
- हरिचरण शइकीया
- प्रा. वेम्पटि कुटुम्ब शास्त्री
- प्रा. शफी शौक
- बलदेव सिंह
- युमनाम जात्रा सिंह (मरणोत्तर)
- डॉ. अशोक कुमार सिंह
- शिवशंकरी
- डॉ. आर. श्रीधर
- प्रा. श्याम सुन्दर
- डॉ. एस. जी. सुशीलम्मा
- एन. स्वामीनादन
- डॉ. केवल कृष्ण ठकराल
- डॉ. गोपाल जी त्रिवेदी (मरणोत्तर)
- अरविंद वैद्य
- प्रा. जुजर वासी
- डॉ. नारायण व्यास
- हैली वार
- प्रा. गम्बीर सिंह योन्जन






## उदय सुरेशकुमार कोटक

उदय सुरेशकुमार कोटक हे भारतातील नामवंत बँकर आणि वित्तीय सेवा क्षेत्रातील पथदर्शकांपैकी एक असून, भारताच्या मुख्य खाजगी बँकांपैकी एका बँकेच्या उभारणीत त्यांची भूमिका अत्यंत महत्वाची आहे. 15 मार्च 1959 रोजी जन्मलेले कोटक यांनी 1985 साली कोटक महिंद्रा फायनान्स लिमिटेडची स्थापना केली होती. या कंपनीचा नंतर गुंतवणूक बँकिंग, स्टॉक बँकिंग, विमा, वाहन फायनान्स आणि म्युच्युअल फंड अशा सेवांमध्ये विस्तार झाला. मार्च 2003 मध्ये ही कोटक महिंद्रा बँक बनली, जी भारतीय रिजर्व बँकेकडून बँकिंग परवाना मिळवणारी पहिली बिगर-बँकिंग वित्तीय कंपनी ठरली. त्यांनी बँकेचा विस्तार केला आणि 2014 साली, आय एन जी वैश्य बँकेचे अधिग्रहण करून, या बँकेची स्थिती आणखी भक्कम केली. भारताच्या बँकिंग आणि वित्तीय क्षेत्राच्या विकासातही त्यांनी महत्वाचे योगदान दिले आहे.




## डॉ. कल्लीपट्टि रामासामी पलानिस्वामी

डॉ. कल्लीपट्टि रामासामी पलानिस्वामी हे प्रतिष्ठित, नावाजलेले पोटविकारतज्ज्ञ असून त्यांना 40 वर्षांचा प्रदीर्घ अनुभव आहे. 15 मार्च 1949 रोजी तामिळनाडूमधल्या कल्लीपट्टि या छोट्याशा गावात, एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले डॉ पलानिस्वामी यांनी 1972 साली म्हैसूर विद्यापीठातून एमबीबीएस ची पदवी मिळवली. त्यानंतर, 1981 साली त्यांनी मद्रासच्या वैद्यकीय महाविद्यालयातून, डीएम – गैस्ट्रोएंटेरोलॉजी (पोटविकारतज्ज्ञ) ही पदव्युत्तर पदवी मिळवली. स्टेनली वैद्यकीय महाविद्यालयात 1986 साली त्यांनी पोटविकारचिकित्सा विभागाची स्थापना केली. 2000 सालापर्यंत त्यांनी उत्तर चेन्नईच्या गरीब लोकांची सेवा करत विभागप्रमुख आणि प्राध्यापक म्हणून कार्य केले. गरीब आणि वंचित लोकांची सेवा करण्यासाठी त्यांनी विशेषतः समर्पित वृत्तीने काम केले आहे. तीन दशकांपेक्षा जास्त काळापासून त्यांनी चेन्नईच्या रामकृष्ण मठ चिकित्सालयात ऐच्छिक सेवा दिली आहे. कल्लीपट्टि या आपल्या गावातही त्यांनी आरोग्य शिबिरे आयोजित केली. त्यासोबतच गावात पूल, विद्युत उपकेंद्र, प्राथमिक आरोग्य केंद्राची नवी भवने आणि भूजल सुधारणा करण्यासाठी बंधाऱ्यांसारख्या पायाभूत सुविधांच्या विकासात योगदान दिले. वैद्यकीय क्षेत्रातील योगदानासाठी, 2007 साली त्यांना पद्मश्री ने सन्मानित करण्यात आले होते.







## प्रा. विजय कुमार मल्होत्रा - मरणोत्तर

प्रा. विजय कुमार मल्होत्रा हे प्रतिष्ठित भारतीय राजनीतिज्ञ, शिक्षणतज्ञ आणि क्रीडा प्रशासक होते. 3 डिसेंबर 1931 साली लाहोरमध्ये त्यांचा जन्म झाला. त्यांनी हिंदी साहित्यात उच्च शिक्षण घेतले आणि कवी सोहनलाल द्विवेदी यांच्यावर पी.एच.डी. केली. सुमारे 36 वर्षांपेक्षा अधिक काळ त्यांनी, दिल्लीतील पीजी-डीएव्ही कॉलेजमध्ये अध्यापन केले आहे. ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेतही सक्रिय होते आणि त्यातूनच राजकारणातही सक्रिय झाले. 1967 साली, वयाच्या अवघ्या 35 व्या वर्षी ते दिल्लीचे सर्वात युवा, मुख्य कार्यकारी नगरसेवक झाले. पाच वेळा खासदार आणि दोन वेळा आमदारही झाले. 1999 साली त्यांनी माजी पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांचा निवडणुकीत पराभव केला होता. क्रीडा प्रशासनातही त्यांचे योगदान अत्यंत महत्वाचे होते. भारताच्या तिरंदाजी संघाचे ते अध्यक्ष होते, या क्रीडाप्रकाराला त्यांनी आंतरराष्ट्रीय पातळीवर ओळख मिळवून दिली. आवास योजना, शिक्षण, क्रीडा आणि झोपडपट्टी पुनर्वसन अशा क्षेत्रात त्यांनी दिलेल्या योगदानामुळे दिल्लीच्या विकासात मोठी भर पडली. 30 सप्टेंबर 2025 रोजी त्यांचे निधन झाले.

## पीयूष पांडेय (मरणोत्तर)

पीयूष पांडेय – भारतीय जाहिरात जगतातील सर्वात प्रभावशाली व्यक्तिमत्त्वांपैकी ते एक होते. आपली सर्जनशीलता, धोरणात्मक दृष्टी आणि सांस्कृतिक समज, यातून त्यांनी या क्षेत्रात आपला अमीट ठसा उमटवला. 5 सप्टेंबर 1955 साली जन्मलेल्या पांडेय यांनी आपल्या कारकीर्दीत अनेक ऐतिहासिक जाहिरात मोहिमा चालवल्या. पोलिओ निर्मूलनासाठी 'दो बूंद जिंदगी की' तसेच 'मिले सुर मेरा तुम्हारा' यांसारख्या मोहिमा केवळ जाहिराती नव्हत्या, तर ती सांस्कृतिक प्रतीके ठरली आहेत. आपल्या सृजनशील क्षमतेने त्यांनी भारतीय जाहिरात उद्योगाला नवी ओळख दिली. 2016 साली त्यांना पद्मश्री देऊन सन्मानित करण्यात आले. 24 ऑक्टोबर 2025 रोजी त्यांचे निधन झाले. त्यांचे कार्य आणि दृष्टिकोन, येणाऱ्या अनेक पिढ्यांना प्रेरणा देत राहील. भारतीय जाहिरात विश्वाचे एक सच्चे अग्रदूत म्हणून ते सदैव सर्वांच्या स्मरणात राहतील.



पंतप्रधानांचा पूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी क्यूआर कोड स्कॅन करा.

# युरोपापासून आखातापर्यंत : भारताच्या वाढत्या जागतिक ताकदीचे दर्शन

*जागतिक स्तरावर भारताची विस्तारत असलेली भूमिका आणि बदलत्या भू-राजकीय समीकरणांच्या काळात, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा संयुक्त अरब अमिरात, नेदरलँड्स, स्वीडन, नॉर्वे आणि इटलीचा दौरा, भारताच्या जागतिक राजकारणाचे सशक्त दर्शन घडवणारा ठरला. ऊर्जा सुरक्षेपासून ते हरित तंत्रज्ञान, संरक्षण सहकार्य, गुंतवणूक, नवोन्मेष आणि संरक्षण भागीदारी पर्यंत.. ह्या दौऱ्याने, भारताच्या बहुआयामी हितांना एक नवी गती दिली. हा दौरा अशा काळात झाला, जेव्हा जग एका नव्या शक्ती-संतुलनाच्या दिशेने वाटचाल करत आहे आणि भारत एक विश्वासार्ह, निर्णायक आणि विकासोन्मुख जागतिक भागीदार म्हणून, स्वतःचे स्थान बळकट करत आहे..*

पाच देशांच्या या दौऱ्यादरम्यान (15 मे ते 20 मे) पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि त्यांचे समकक्ष नेते यांच्यात द्विपक्षीय आणि जागतिक मुद्यांवर विस्तृत चर्चा झाली. बदलत्या जागतिक परिस्थितीत झालेल्या या उच्चस्तरीय चर्चांमध्ये भारताच्या, आर्थिक, सामरिक आणि जागतिक हितांना केंद्रस्थानी ठेवण्यात आले होते. या बैठकांमध्ये ऊर्जा सुरक्षा, हरित विकास, संरक्षण सहकार्य, तंत्रज्ञान नवोन्मेष, डिजिटल सहकार्य, जल व्यवस्थापन, गुंतवणूक आणि व्यापार विस्तार अशा विषयांवर व्यापक चर्चा झाली.

युएई सोबत ऊर्जा आणि गुंतवणुकीविषयीच्या संबंधाना एक नवी मजबूती मिळाली, तर युरोपसोबत, ऊर्जा आणि गुंतवणूक विषयक संबंधाना नवी बळकटी मिळाली. भारताने युरोपीय देशांसाठी एक विश्वासार्ह भागीदार म्हणून आपली भूमिका अधिक मजबूत केली. या दौऱ्याने, 'विकसित भारताचा' आपला दृष्टिकोन, जागतिक व्यवस्थेत

## भारत संयुक्त अरब अमिरात संबंध

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि संयुक्त अरब अमिरातीचे राष्ट्राध्यक्ष, मोहम्मद बिन जायद अल नाहयान यांच्यात सविस्तर चर्चा झाली. पंतप्रधान मोदी यांनी संयुक्त अरब अमिरातीवर झालेल्या हल्ल्यांचा निषेध केला आणि भारत त्यांच्यासोबत उभा असल्याची वचनबद्धताही व्यक्त केली. होर्मुझच्या सामुद्रधुनीतून सुरक्षित वाहतूक आणि निर्वेध सागरी मार्ग चालू ठेवण्याच्या गरजेवरही भारताने भर दिला. प्रादेशिक शांतता, स्थैर्य, ऊर्जा आणि अन्नसुरक्षा अबाधित ठेवण्यासाठी हे अत्यंत आवश्यक असल्याचे मत, भारताने व्यक्त केले.

दोन्ही नेत्यांनी, भारत-युएई ऊर्जा भागीदारी सातत्याने अधिकाधिक बळकट होत असल्याबद्दल आनंद व्यक्त केला, आणि ही भागीदारी पुढे नेण्यासाठी पुढाकार घेण्याबद्दलही सहमती व्यक्त केली. याच मालिकेत, इंडियन स्ट्रैटेजिक पेट्रोलियम रिजर्व्ह लिमिटेड (आयएसपीआरएल) आणि अबू धाबी नॅशनल ऑइल कंपनी यांच्यात झालेल्या धोरणात्मक सहकार्य कराराचेही स्वागत करण्यात आले. या अंतर्गत, भारताच्या धोरणात्मक पेट्रोलियम साठयात, युएईची भागीदारी वाढवून, तीन कोटी बॅरल इतकी केली जाईल. त्यासोबतच दोन्ही देश, धोरणात्मक पद्धतीने भारतात गॅस साठे स्थापन करण्यासाठीही एकत्र काम करतील. दोन्ही नेत्यांनी युएईच्या कंपनीद्वारे भारतात पाच अब्ज डॉलर्सच्या गुंतवणुकीच्या घोषणेचेही स्वागत केले. यात अमिरात ब्लू डेवलपमेंट बँकेद्वारे, आरबीएल बँकेत तीन अब्ज डॉलर्स, अबू धाबी गुंतवणूक अथॉरिटीतर्फे राष्ट्रीय गुंतवणूक आणि पायाभूत सुविधा निधीमध्ये एक अब्ज डॉलर्स तसेच आंतरराष्ट्रीय होल्डिंग कंपनीतर्फे सन्मान भांडवलात एक अब्ज डॉलर्स इतक्या गुंतवणुकीचा समावेश आहे.

भारतचा वाढता प्रभाव आणि नेतृत्व क्षमताही अधोरेखित केली.


### भारत-इटली

इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी यांच्या निमंत्रणाचा स्वीकार करत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दौऱ्यात, इटली इथे द्विपक्षीय संबंधाना नवी गती दिली. दोन्ही नेत्यांनी भारत-इटली संबंध, 'विशेष धोरणात्मक भागीदारी'च्या उच्च स्तरावर नेण्याचा निर्णय घेतला. त्यासोबतच, राजनैतिक संवाद, आर्थिक सहकार्य आणि गुंतवणूक, संपर्क व्यवस्था, विज्ञान, तंत्रज्ञान, नवोन्मेष, स्टार्ट अप आणि कृत्रिम बुद्धिमत्ता, सुपर कॉम्प्युटिंग, अंतराळ, संरक्षण, सुरक्षा, संस्कृती आणि शैक्षणिक देवघेव, अशा विषयांवर एकत्रित काम करण्याचा निर्णय घेतला आहे.

संयुक्त राष्ट्रांना, वर्तमान जागतिक परिस्थितीशी सुसंगत बनवण्यासाठी, त्यात तत्काळ सुधारणा करण्याच्या आवश्यकतेवर दोन्ही नेत्यांनी यावेळी भर दिला. होर्मुझ सामुद्रधुनीमधून वाहतुकीचे स्वातंत्र्य आणि जागतिक पुरवठा साखळी पुन्हा सुरळीत सुरू करण्याचे आवाहनही दोन्ही नेत्यांनी यावेळी केले. दोन्ही नेत्यांनी 2029 सालापर्यंत, द्विपक्षीय व्यापार 20 अब्ज युरोपर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट निश्चित केले आहे. 2027 हे वर्ष 'भारत आणि इटली यांच्यात, सांस्कृतिक आणि पर्यटन वर्ष' म्हणून साजरे करण्यावरही यावेळी सहमती झाली.

### भारत-डेन्मार्क द्विपक्षीय सहकार्य:

ऑस्लो इथे भारत-नॉर्डिक तृतीय शिखर संमेलनादरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि डेन्मार्कचे तत्कालीन काळजीवाहू पंतप्रधान मेटे फ्रेडरिक्सन यांच्यात बैठक झाली. या बैठकीत,



पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी इथे देण्यात आलेला QR कोड स्कॅन करावा.

# द रॉयल नॉर्वे ऑर्डर ऑफ मेरिटच्या भव्य - ग्रॅन्ड क्रॉसने पंतप्रधानांचा सन्मान



- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ओस्लो इथे नॉर्वेचे सम्राट हेराल्ड पंचम यांच्या हस्ते, एका विशेष समारंभात, ''द रॉयल नॉर्वे ऑर्डर ऑफ मेरिट ग्रॅन्ड क्रॉस' ने सन्मानित करण्यात आले.
- परदेशी राष्ट्राध्यक्षांना प्रदान केला जाणारा, हा नॉर्वेचा सर्वोच्च सन्मान आहे. मानवतेच्या हितासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल नॉर्वेतर्फे हा सन्मान प्रदान केला जातो.
- पंतप्रधान मोदी यांनी हा सन्मान भारत आणि नॉर्वे यांच्यातल्या ऐतिहासिक मैत्रीला समर्पित केला. हा सन्मान म्हणजे भारत आणि नॉर्वेच्या जनतेमधील संयुक्त स्नेहबंध, उत्साह आणि विश्वासाप्रती व्यक्त केलेली आदरांजली असल्याचे म्हटले आहे.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी इथे देण्यात आलेला QR कोड स्कॅन करावा.

दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय सहकार्याचा आढावा घेतला. दोन्ही देशांनी, पर्यावरण आणि हवामान बदलाच्या क्षेत्रात सहकार्याला प्राधान्य देणाऱ्या, हरित धोरणात्मक भागीदारीमध्ये झालेल्या प्रगतीचे स्वागत केले. तसेच, दोन्ही देशांनी, नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, दूरसंचार, अद्ययावत संशोधन, स्टार्टअप आणि शैक्षणिक देवघेवविषयक सहकार्य अधिक सुदृढ करण्याचा निर्णय घेतला. जल क्षेत्रात, दोन्ही नेत्यांनी वाराणसी इथे, स्वच्छ नद्यांसाठी स्मार्ट प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी, भारत आणि डेन्मार्क यांच्यातील यशस्वी सहकार्याचा उल्लेख केला.

## भारत नॉर्वे यांच्यातील द्विपक्षीय चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऑस्लो इथे नॉर्वेचे पंतप्रधान जोनास गहर स्टोर यांच्याशी द्विपक्षीय चर्चा केली. दोन्ही देशांमध्ये व्यापार आणि गुंतवणूक, आर्थिक भागीदारी करार, ऊर्जा परिवर्तन, नील अर्थव्यवस्था आणि सागरी नियमन, संशोधन आणि उच्च शिक्षण, आर्क्टिक आणि ध्रुवीय सहकार्य, अंतराळ आणि दर्जेदार कौशल्याची देवघेव, अशा विषयांवर चर्चा झाली. दोन्ही देशांनी आपले संबंध, शाश्वत विकास आणि हरित प्रगतीशी कटिबद्ध असलेल्या 'हरित धोरणात्मक भागीदारी' पर्यंत वाढवण्यास सहमती दर्शवली. दोन्ही नेत्यांनी भारत आणि नॉर्वेमधील सध्या असलेला व्यापार 2030 सालापर्यंत दुप्पट करण्याचे उद्दिष्ट निश्चित केले, जेणेकरुन, टीईपीए अंतर्गत 100 अब्ज डॉलर्सची गुंतवणूक करण्याची वचनबद्धता पूर्ण केली जाऊ शकेल. असे झाल्यास, भारतात 10 लाख रोजगाराच्या संधी निर्माण होऊ



## ॲग्रीकोला मेडलने पंतप्रधानांचा सन्मान

- पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना रोम इथल्या अन्न आणि कृषी संघटनेच्या मुख्यालयात, संयुक्त राष्ट्र कृषी संघटनेतर्फे ( एफ ए ओ) 2026 वर्षासाठीच्या प्रतिष्ठित ॲग्रीकोला मेडलने सन्मानित करण्यात आले.
- हा पुरस्कार, भारतात तसेच जागतिक स्तरावर अन्नसुरक्षा, शाश्वत कृषी आणि ग्रामीण विकास अशा क्षेत्रातील त्यांचे असामान्य नेतृत्व मान्य करत, त्यांच्या सन्मानार्थ प्रदान करण्यात आला.
- पंतप्रधान मोदी यांनी हा पुरस्कार भारतीय शेतकरी आणि भारतीय कृषी शास्त्रज्ञांना समर्पित केला.

पंतप्रधानांचा संपूर्ण कार्यक्रम पाहण्यासाठी इथे देण्यात आलेला QR कोड स्कॅन करावा.



प्रधानमंत्री का पूरा कार्यक्रम देखने के लिए QR कोड स्कैन करें।

# 'मेक इन इंडिया' पासून जागतिक भागीदारी पर्यंत

ओस्लोमध्ये आयोजित भारत-नॉर्वे व्यापार आणि संशोधन शिखर परिषदेत पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी झाले होते. या शिखर परिषदेत 50 हून अधिक कंपन्यांचे सीईओ आणि नॉर्वे आणि भारतातील व्यापार आणि संशोधन क्षेत्रातील 250 हून अधिक सहभागी उपस्थित होते. या शिखर परिषदेपूर्वी ओस्लोमध्ये विविध ठिकाणी चार गोलमेज सत्रे आयोजित करण्यात आली होती. नॉर्वेच्या गुंतवणूकदारांना नील अर्थव्यवस्था, जहाजबांधणी, हरित संक्रमण, नवीकरणीय ऊर्जा, हेल्थ-टेक, अत्यावश्यक खनिजे आणि स्टार्टअप्स यांसारख्या प्रमुख क्षेत्रांमध्ये भारतातील गुंतवणूक वाढवण्यासाठी प्रोत्साहित करण्यात आले. पंतप्रधानांनी दोन्ही देशांतील व्यापार समुदायांना नवीन भागीदारी प्रस्थापित करण्याचे, सहकार्याची नवीन क्षेत्रे ओळखण्याचे आणि आर्थिक सहकार्य अधिक मजबूत करण्याचे आवाहन केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ऊर्जा, बंदरे, आरोग्यसेवा, कृषी, व्यापार आणि तंत्रज्ञान यांसारख्या विविध क्षेत्रांतील महत्त्वपूर्ण डच कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी चर्चा केली. भारताच्या आर्थिक गतिशीलतेमध्ये डच कंपन्यांनी दाखवलेल्या वाढत्या स्वारस्याचे पंतप्रधान मोदींनी कौतुक केले. उद्योगपतींनी भारत सरकारच्या सुधारणा धोरणांची प्रशंसा केली आणि भारतासाठीच्या त्यांच्या भावी योजनांची माहिती दिली.

### स्वीडिश कंपन्यांच्या सीईओंशी चर्चा

पंतप्रधान मोदींनी स्वीडिश कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांशी संवाद साधला. पंतप्रधान मोदी म्हणाले की, आज भारत-स्वीडन भागीदारी केवळ एक आर्थिक संबंध नसून, ती विचार, तंत्रज्ञान, नवोन्मेष आणि सह-निर्मितीची भागीदारी आहे.

पंतप्रधान मोदींनी भारतात वेगाने होत असलेल्या आर्थिक परिवर्तनाची माहिती दिली जे सुधारणा, मजबूत देशांतर्गत मागणी, डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा, विस्तारणारे उत्पादन आणि नवीन पिढीच्या पायाभूत सुविधांच्या विकासाने प्रेरित आहे. त्यांनी 'मेक इन इंडिया', 'राष्ट्रीय हरित हायड्रोजन मिशन' आणि 'नॅशनल क्रिटिकल मिनरल्स मिशन' यांसारख्या योजनांअंतर्गत भारतात आपला विस्तार करण्यासाठी स्वीडिश कंपन्यांना आमंत्रित केले.

### युरोपियन उद्योग गोलमेज

गोथेनबर्ग येथे झालेल्या युरोपियन उद्योग गोलमेजमध्ये पंतप्रधान मोदींनी भारत आणि युरोप यांच्यातील वाढत्या धोरणात्मक समन्वयावर भर दिला. त्यांनी भारत-युरोपियन युनियन संबंधांमधील प्रगतीचे स्वागत केले. आज भारत गुंतवणूक, नवोन्मेष आणि उत्पादनासाठी जगातील सर्वात आकर्षक ठिकाणांपैकी एक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यावर जोर दिला की, लवचिक पुरवठा साखळी विकसित करण्यासाठी भारत आणि युरोपने एकत्र काम केले पाहिजे. पंतप्रधान मोदींनी भारताच्या तरुण आणि कुशल मनुष्यबळाला भविष्यातील जागतिक आर्थिक विकासासाठी एक प्रमुख शक्ती म्हणून संबोधले.

शकतील. भारत ने नॉर्वे ला जून 2026 साली. में मध्ये फ्रान्समध्ये होणाऱ्या 'भारत इनोव्हेट्स 2026' मध्ये सहभागी होण्यासाठी आमंत्रित केले. दोन्ही देशांमध्ये स्टार्टअप इनोव्हेशन हब आणि ग्रीन इनोव्हेशन हॅकाथॉनची स्थापना करण्याचा प्रस्तावही मांडण्यात आला. दोन्ही नेत्यांनी दहशतवादाच्या सर्व प्रकारांचा एकमताने निषेध केला.

## भारत-नेदरलँड्स चर्चा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नेदरलँडचे पंतप्रधान रॉब जेटेन यांच्याशी त्यांच्या शासकीय निवासस्थानी (कॅटशुइस) चर्चा केली. दोन्ही पंतप्रधानांनी भारत-नेदरलँड्स संबंध अधिक दृढ करण्याबाबत विस्तृत चर्चा केली. दोन्ही नेत्यांनी द्विपक्षीय संबंधांना



## पीएम मोदींना स्वीडनचा सन्मान

- स्वीडनमध्ये आयोजित एका विशेष समारंभात स्वीडनच्या क्राऊन प्रिन्सेस व्हिक्टोरिया यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना 'रॉयल ऑर्डर ऑफ द पोलर स्टार, डिग्री कमांडर ग्रँड क्रॉस' हा पुरस्कार प्रदान केला.
- हा स्वीडनच्या सर्वात प्राचीन आणि प्रतिष्ठित सन्मानांपैकी एक आहे, ज्याची स्थापना 18 व्या शतकात झाली होती.
- असामान्य सार्वजनिक सेवा आणि स्वीडनसोबतचे संबंध दृढ करण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल परदेशी राष्ट्रप्रमुखांना दिला जाणारा हा स्वीडनचा सर्वोच्च सन्मान आहे.
- पंतप्रधान मोदींनी हा सन्मान भारताच्या 140 कोटी जनतेला आणि भारत व स्वीडन यांच्यातील चिरस्थायी मैत्रीला समर्पित केला.





## चोल ताम्रपट आले परत

- पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नेदरलँडचे पंतप्रधान रॉब जेटेन यांच्या उपस्थितीत लायडेन विद्यापीठाच्या ग्रंथालयाने 11 व्या शतकातील चोल ताम्रपट भारत सरकारला परत केले. 21 मोठे आणि 3 छोटे ताम्रपट असलेले हे चोल ताम्रपट 11व्या शतकात चोल राजांनी जारी केलेले राजशिलालेख आहेत. या ताम्रपटांवर तमिळ आणि संस्कृत भाषेतील मजकूर आहे.

'धोरणात्मक भागीदारी'च्या पातळीपर्यंत नेण्याचा निर्णय घेतला. व्यापार - गुंतवणूक, संरक्षण आणि सुरक्षा, उदयोन्मुख आणि महत्त्वपूर्ण तंत्रज्ञान, सागरी क्षेत्र, नवीकरणीय ऊर्जा आणि शिक्षण या क्षेत्रांमधील सहकार्य अधिक दृढ करण्यासाठी त्यांनी एक धोरणात्मक भागीदारी पथदर्शक स्वीकारण्यास सहमती दर्शवली.


दोन्ही नेत्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि सेमीकंडक्टरसह उदयोन्मुख तंत्रज्ञानामध्ये सहकार्याचे आवाहन केले. दोन्ही पंतप्रधानांनी 'मोबिलिटी पार्टनरशिप' आणि उच्च शिक्षणातील सहकार्य अधिक दृढ करण्यासाठीच्या नवीन उपक्रमांना आपला पाठिंबा व्यक्त केला. या संदर्भात, नालंदा विद्यापीठ आणि ग्रोनिंगेन विद्यापीठ यांच्यात झालेल्या कराराचा विशेष उल्लेख करण्यात आला. अधिकृत चर्चेनंतर तंत्रज्ञान, हरित ऊर्जा, व्यापार, गतिशीलता, पाणी, कृषी आणि आरोग्य, शिक्षण आणि संस्कृती या क्षेत्रांमधील 14 सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आली. ■

X



**Narendra Modi**
@narendramodi

भारताच्या विविध भागांमध्ये तापमानात प्रचंड वाढ होत असून त्यासोबत अनेक आव्हानेही निर्माण झाली आहेत. ही उष्णता आपल्या सर्वांसाठीच त्रासदायक आहे, त्यामुळे मी आपणा सर्वांना शक्य तितकी खबरदारी घेण्याचे आवाहन करतो. कृपया शरीरातील पाण्याचे प्रमाण योग्य राखा आणि घराबाहेर पडताना सोबत पाणी ठेवा. इतरांनाही एक पेला पाणी द्या. अशा हवामानात दाखवलेली ही माणुसकी खूप मोलाची ठरते.




**Rajnath Singh**
@rajnathsingh

डिफेन्स कॉरिडॉरच्या माध्यमातून उत्तर प्रदेश भारताच्या संरक्षण क्षेत्राला आत्मनिर्भर बनवत आहे. येथे लखनौमध्ये ब्राह्मोसचे उत्पादनही केले जात आहे. इतरही अनेक मार्गांनी उत्तर प्रदेश संरक्षण उत्पादन क्षेत्र मजबूत करत आहे.



**Amit Shah**
@AmitShah

बीएसएफच्या शौर्याची माहिती जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी गुजरातमध्ये एक केंद्र स्थापन करण्यात आले. अभिप्राय पत्रकावर अनेक मातांनी लिहिले, "आमची मुले बीएसएफमध्ये सामील झाली तर आम्हाला अभिमान वाटेल."



**Nitin Gadkari**
@nitin_gadkari

अनेक दशकांपासून, पथविक्रेत्यांनी आपल्या शहरांना ऊर्जा पुरवली, परंतु धोरण आणि वित्तपुरवठ्यात ते दुर्लक्षित राहिले. पंतप्रधान @narendramodi जी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली, पीएम स्वनिधी योजनेने त्यांना ओळख, तारण-मुक्त कर्ज आणि डिजिटल समावेश देऊन त्यांचे जीवन बदलले आहे.



**Jagat Prakash Nadda**
@JPNadda

एनसीडी तपासणी अंतर्गत, आतापर्यंत 36 कोटी लोकांची तोंडाच्या कर्करोगासाठी, 17 कोटी महिलांची स्तनाच्या कर्करोगासाठी, 9 कोटी महिलांची गर्भाशयमुखाच्या कर्करोगासाठी आणि प्रत्येकी 42 कोटी लोकांची उच्च रक्तदाब व मधुमेहासाठी तपासणी करण्यात आली आहे.



**Gajendra Singh Shekhawat**
@gssjodhpur

भारत आता 'सुपर सोलर पॉवरही!


2025 पर्यंत वार्षिक सौर ऊर्जा क्षमता वाढीच्या बाबतीत भारताने अमेरिकेला मागे टाकून जगातील दुसरी सर्वात मोठी सौर बाजारपेठ बनण्याचा मान मिळवला आहे. एकाच वर्षात जवळपास 50 गिगावॅट नवीन सौर ऊर्जा क्षमता जोडली गेली.

## विनम्रता, क्षमाशीलता और उत्तम आचरण ही व्यक्तित्व के सच्चे आभूषण हैं : मोदी



## स्वनिधि योजना ने लाखों रेहड़ी-पटरी वालों को किया सशक्त : मोदी

### पीएम ने योजना के लाभार्थियों को दी बधाई, उनके दृढ़ संकल्प और उद्यमशीलता को सराहा



**उपलब्धियां : करीब 9 लाख करोड़ का डिजिटल लेनदेन**

**आय में 20% की सालाना बढ़ोतरी दर्ज हुई**

**योजना की खास बातें**

## राष्ट्रीय खेलों में चार रिकार्ड बनना नए व आकांक्षी भारत का प्रतीक



## भारत-म्यांमार: रक्षा, व्यापार व कनेक्टिविटी पर सहमति




भास्कर न्यूज | नई दिल्ली


म्यांमार ने भारत को भरोसा दिलाया कि उसकी जमीन का इस्तेमाल भारत की सुरक्षा के खिलाफ नहीं होने दिया जाएगा। प्रधानमंत्री नरेंद्र मोदी और म्यांमार के राष्ट्रपति मिन आंग ह्लाइंग के बीच सोमवार को नई दिल्ली में हुई व्यापक वार्ता में दोनों देशों ने रक्षा, व्यापार, ऊर्जा, सीमा सुरक्षा और कनेक्टिविटी से जुड़े मुद्दों पर सहयोग बढ़ाने पर जोर दिया। मिन आंग ह्लाइंग पांच दिन की भारत यात्रा पर हैं। यह यात्रा ऐसे समय हो रही है जब वे हाल ही में म्यांमार के संसदीय चुनावों के बाद राष्ट्रपति बने हैं।

## 3.25 लाख करोड़ रुपये में 114 राफेल खरीदेगा भारत फ्रांस को भेजा अनुरोध पत्र

नई दिल्ली। रक्षा मंत्रालय ने 114 राफेल लड़ाकू विमान खरीदने के लिए फ्रांस सरकार को अनुरोध पत्र जारी कर दिया है। यह कदम करीब 3.25 लाख करोड़ की अनुमानित लागत वाले इस सौदे की औपचारिक शुरुआत है।



## बिहार के सत्तू व जर्दालु आम का कोई मुकाबला नहीं; ये ताकत देगा: पीएम



**मन की बात में पीएम की खास बातें...**




**झारखंड के धावकों की तारीफ कर बोले पीएम- ये देश के भविष्य**

आंतरराष्ट्रीय एमएसएमई दिन – 27 जून 2026

# एमएसएमई : सामाजिक-आर्थिक प्रगतीचा प्रमुख आधारस्तंभ

*सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (एमएसएमई) क्षेत्र भारताच्या आर्थिक आणि सामाजिक विकासात महत्त्वाची भूमिका बजावते. हे क्षेत्र कमी भांडवली खर्चात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण करते आणि मोठ्या उद्योगांना सहायक घटक म्हणून आधार देते. हे क्षेत्र ग्रामीण आणि मागासलेल्या भागांमध्ये औद्योगिकीकरणाला प्रोत्साहन देते. आंतरराष्ट्रीय एमएसएमई दिन दरवर्षी 27 जून रोजी साजरा केला जातो. भारत सरकारचे एमएसएमई मंत्रालय विविध संस्था आणि संघटनांच्या सहकार्याने या क्षेत्राच्या विकासाला सातत्याने देत आहे प्रोत्साहन ...*



## स्वदेशी अर्थव्यवस्थेला बळकटी देणारे एमएसएमई

- एमएसएमई क्षेत्राचे सकल देशांतर्गत उत्पादनात (जीडीपी) 31 टक्क्यांहून अधिक आणि निर्यातीत 48.58 टक्के योगदान.
- देशभरातील 32.8 कोटी लोकसंख्येची उपजीविका एमएसएमईवर अवलंबून आहे. 7.9 कोटींहून अधिक उद्योग औपचारिक अर्थव्यवस्थेत सामील झाले आहेत.
- 'जेम', 'ट्रेड्स' और 'समाधान' यांसारखे डिजिटल प्लॅटफॉर्म बाजारपेठेतील प्रवेश सुधारण्यासाठी आणि देयके जलदगतीने करण्यासाठी एसएमईना करत आहेत मदत.



“

*आपले एमएसएमई क्षेत्र हे भारताच्या उत्पादन आणि औद्योगिक विकासाचा कणा आहे. 2020 मध्ये आपण एमएसएमईच्या व्याख्येत सुधारणा करण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला. हे 14 वर्षांनंतर करण्यात आले. या निर्णयामुळे एमएसएमईमध्ये असलेली ही भीती दूर झाली की, जर पुढे गेलो तर सरकारकडून मिळणाऱ्या लाभांना मुकावे लागेल*

– नरेंद्र मोदी, पंतप्रधान

न्यू इंडिया समाचार पाक्षिक

आर.एन.आय, DELHIN/2020/78812, 16-30 जून, 2026

आरएनआय DELHIN/2020/78812 (प्रकाशन दिनांक - 5 जून 2026, एकूण पृष्ठ-36)

मुख्य संपादक
धीरेंद्र ओझा, प्रधान महासंचालक
पत्र सूचना कार्यालय, नवी दिल्ली

प्रकाशक
कंचन प्रसाद, महासंचालक,
केंद्रीय संचार ब्यूरो

खोली क्रमांक 278, केंद्रीय संचार ब्यूरो,
सूचना भवन, दुसरा मजला, नवी दिल्ली
110003 येथून प्रकाशित